दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे अंक –२५३ शुक्रवार,दि.१६ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-253 | Friday, Dt.16 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# ऐतिहासिक निर्णय : ना. पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत पशुसंवर्धन अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या

## पुण्यातील पशुसंवर्धन आयुक्तांच्या कार्यालयात पार पडली बदल्यांची कार्यवाही
## समुपदेशनाने बदल्यांचा निर्णय भविष्यातही कायम राहील – ना. पंकजाताई मुंडे

पुणे । प्रतिनिधी

पुन्हा एकदा इतिहास घडविताना या ऐतिहासिक क्षणाची मी साक्षीदार होतेयं याचा मला अतिशय आनंद होत आहे. अधिकाऱ्यांचे मनोबल वाढवून भ्रष्टाचारमुक्त धोरण राबविणे यासाठी पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याचा निर्णय मी घेतला. हा निर्णय भविष्यातही कायम राहील. गाव पातळीवर कष्ट करणाऱ्या सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद माझ्यासाठी महत्वाचा आहे. तुमच्या बदल्या मनासारख्या केल्या आहेत, आता चांगले आणि फ्रेश मनाने काम करा अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा आणि बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नुकताच घेतला होता. या बदल्यांची प्रक्रिया आजपासून आयुक्त पशुसंवर्धन यांच्या कार्यालयात ना. पंकजाताईंच्या उपस्थितीत सुरू झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पशूसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी, आयुक्त प्रवीण कुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे यावेळी उपस्थित होते.

ग्रामविकास मंत्री असताना शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांचा निर्णय मी घेतला होता, त्यावेळी त्याचा फायदा अनेक शिक्षकांना जे तिथपर्यंत पोहोचू शकत नव्हते त्यांना झाला. आऊट ऑफ बॉक्स जाऊन निर्णय घेण्याची आवड असल्याने आताही पशुसंवर्धन विभागासाठी मी हा निर्णय घेतला. एकदा घेतलेला निर्णय बदलत नाही, त्यामुळे भविष्यातही हा निर्णय कायम राहणार आहे. माझे वडील लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणायचे, ज्याची पत नाही, ऐपत नाही त्यांचा आवाज बनण्यासाठी मी राजकारणात आहे, अगदी तोच वारसा घेऊन मी काम करत आहे. माझ्यावर प्रेम करणारे असंख्य लोक आहेत, त्यांच्यासाठी तुम्ही काम करता, त्यामुळे हा निर्णय घेतला. सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला महत्वाचा वाटतो. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी आपल्या परिवारापासून दूर असणारे, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना यामुळे हवी ती पोस्टींग मिळणार आहे. हव्या त्या ठिकाणी बदल्या झाल्याने तुमच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद समाधान देणारा आहे असं ना. पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.







### हवी ती पोस्टींग मिळाली, अधिकारी खूश!

समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही आजपासून सुरू झाली असून उद्याही म्हणजे १६ मे रोजी ही कार्यवाही सुरू असणार आहे. आज आदिवासी व नक्षलग्रस्त अवघड क्षेत्रात असलेल्या ११८ आणि बिगर अवघड क्षेत्रात असलेल्या ४४४ अधिकाऱ्यांच्या बदल्या त्यांच्या मनाप्रमाणे करण्यात आल्या. ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे मनाप्रमाणे आणि सहजतेने हवी ती पोस्टींग मिळाल्याने अधिकारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### खूप चांगला निर्णय – डॉ आकाश ठाकरे

मी यवतमाळ जिल्ह्यातील आहे, माझी पहिली पोस्टींग २०२२ मध्ये त्र्यंबकेश्वर येथे झाली. आदिवासी क्षेत्रात तीन वर्ष सेवा दिली. आता समुपदेशनाने मला माझा जिल्हा मिळाला. मला खूप आनंद झाला. ना. पंकजाताईंनी घेतलेला निर्णय आमच्या सारख्या अधिकाऱ्यांचे मनोबल वाढविणारा आहे.

डॉ. प्रियंका स्वामीदास

मी सिरोंचा तालुक्यात कार्यरत होते. हा भाग तेलंगणा सीमेवर असल्याने इथे मराठीपेक्षा तेलगू बोलली जाते. मला तेलगू भाषा येते.खेड्यातील लोकांशी चांगला संवाद साधता येतो. लोक म्हणाले तुमची बदली झाल्यावर आमचे कसे होईल? आता समुपदेशनाने मी इथेच राहिले. हवे असलेले ठिकाणी मिळाल्याने मी खूश आहे. खरचं हा निर्णय ऐतिहासिक आहे. मंत्री महोदय ना. पंकजाताईंचे खूप खूप आभार!

# रखरखत्या उन्हात जिल्हाधिकाऱ्यांनी केली धार्मिक स्थळांची अचानक पाहणी







बीड /प्रतिनिधी

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी रखरखत्या उन्हामध्ये अचानक आपल्या प्रशासकीय अधिकारी टीमला सोबत घेऊन खंडेश्वरी , कंकालेश्वर मंदिर तसेच एमआयडीसी परिसरात भेट देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी केली.

खंडेश्वरी देवी संस्थान, कंकालेश्वर मंदिरास भेट देऊन परिसराची पाहणी केली.परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत गुरव व पुजारी यांना सूचना केल्या. यावेळी सोबत उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके , जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाने , एमआयडीसी विभागाचे अधिकारी , भूमी अभिलेख विभागाचे संजय जायभाये , तलाठी शरद घोडके सोबत होते.



# शिवसंग्राम मध्ये असंख्य युवकांचा जाहीर प्रवेश

## विद्यार्थी आघाडीची कार्यकारणी जाहीर

बीड (प्रतिनिधी) लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आज शिवसंग्राम भवन येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला असून येणाऱ्या काळात शिवसंग्रामच्या माध्यमातून युवक,तरुण ,विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी लढा देण्याचे आणि त्यांच्या समस्या सोडवण्याचा निर्धार यावेळी युवकांनी केला या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे, शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे,धर्मराज मागदे सर , मनोज जाधव, विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील, अशोक लोकरे, शेषेराव तांबे, कैलास शेजाळ आदी. उपस्थित होते.

डॉ. ज्योती मेटे यांच्या उपस्थितीत आज असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी मंचावर शिवसंग्राम चे विविध पदाधिकारी उपस्थित होते. हा पक्षप्रवेश शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील यांच्या नेतृत्वात करण्यात आला असून यावेळी लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी त्यांच्या हयातीमध्ये युवक, तरुण, विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी केलेले कार्याला उजाळा देताना डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या की, मेटे साहेबांनी त्यांच्या हयातीमध्ये अनेक तरुणांना रोजगार मेळाव्यांचे आयोजन करून त्यांच्या हाताला काम दिले त्याचबरोबर पोलीस भरतीची वयोमर्यादा वाढवण्याचे काम केले, एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना दर रविवारी पुणे येथे मोफत जेवणाची व्यवस्था केली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सजग समाज निर्मितीसाठी तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे यासाठी व्यसनमुक्तीचा लढा उभा केला या सर्व कार्यांनी प्रेरित होऊन आज शिवसंग्राम मध्ये युवक मोठ्या प्रमाणात सामील होत आहेत याचा मनस्वी आनंद होत आहे. आपण सर्व एकत्रितपणे मेटे साहेबांचे सजग समाज निर्मितीचे स्वप्न पूर्ण करू आणि शिवसंग्राम तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करू अशी साद त्यांनी यावेळी घातली. यावेळी प्रवेश केलेल्या युवकांना आणि विद्यार्थ्यांना विद्यार्थी आघाडीच्या विविध पदांवर जबाबदारी देण्यात आली.

# पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय रौप्य महोत्सवी अधिवेशन १५ जून रोजी संभाजीनगर येथे होणार !

## ७ जून रोजी पुण्यात राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन – प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे

पुणे राजयोग प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची राज्यस्तरीय बैठक पुणे येथे १५ मे रोजी संपन्न झाली. या बैठकीत पत्रकार संघाची आगामी ध्येय धोरणे निश्चित करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे पहिले रौप्य महोत्सवी मराठवाडा विभागीय अधिवेशन छत्रपती संभाजी नगर येथे १५ जून रोजी घेण्याबाबत निश्चित झाले. या विभागीय मेळाव्यामध्ये मराठवाड्यातील यशस्वी रत्नांना मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे पहिले रौप्य महोत्सवी मराठवाडा विभागीय अधिवेशन छत्रपती संभाजीनगर येथे १५ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात यावे अशी मागणी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांनी राज्यस्तरीय बैठकीत केली. या मागणीला राज्यस्तरीय कमिटीने मान्यता दिली. या बैठकीला पत्रकार संघाचे संस्थापक राज्य संघटक संजयजी भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे,प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी,सांस्कृतिक विभाग प्रमुख संदीप भटेवरा, प्रदेश कार्यकारणी सदस्य अनिल रहाणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या राज्यस्तरीय बैठकीमध्ये मराठवाडा विभागाचे पहिले रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशन कसे असेल ? या अधिवेशनाला कोण कोण मान्यवर निमंत्रित करायचे ? मराठवाडा विभागाच्या यशस्वी वाटचालीमध्ये ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्या रत्नांना पत्रकार संघाच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये प्रतिनिधिक स्वरूपामध्ये सत्कार करून सन्मानित करण्याचे निश्चित करण्यात आले. या मराठवाडा विभागीय रौप्य महोत्सवी अधिवेशनाची सर्वस्वी जबाबदारी मराठवाड्यातील आठही



जिल्ह्याच्या वतीने मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांनी स्वीकारली.त्यास राज्यस्तरीय कमिटीतील उपस्थित सर्व मान्यवरांनी सहमती देऊन मान्यता दिली.

पुणे येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची राज्यस्तरीय बैठक ७ जून २०२५ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले. या बैठकीला पत्रकार संघाचे राज्यस्तरीय कमिटी वरील पदाधिकारी, सदस्य तसेच सर्व विभागीय अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष निमंत्रित असतील.या बैठकीमध्ये पत्रकार संघाची पुढील वाटचाल, ध्येय धोरणे, पत्रकार संघाचे सभासदत्व, निवड प्रक्रिया, राज्यस्तरीय मेळावा, विभागीय मेळावे, जिल्हास्तरीय तालुकास्तरीय मेळावे तसेच राज्यस्तरावर ऐनवेळी राबवण्यात येणाऱ्या विविध विषयांवर दिशा निश्चित करण्यात येणार राज्यस्तरीय स्वतंत्र महिला संघटन संदर्भात चर्चा करून पुढील योग्य ती दिशा निश्चित करण्यात येणार आहे.

# अंबाजोगाईत 'तिरंगा रॅली'स उत्स्फूर्त प्रतिसाद; 'ऑपरेशन सिंदूर'मधील भारतीय लष्कराच्या शौर्याला सलाम

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

पहलगाम येथे नुकत्याच घडलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने व भारतीय लष्कराने संयुक्तपणे राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या अत्यंत प्रभावी मोहिमेमुळे दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले गेले. देशाच्या सुरक्षेसाठी जीवाचे रान करणाऱ्या वीर जवानांच्या या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या शौर्याला मानवंदना देण्यासाठी आज अंबाजोगाई शहरात 'तिरंगा रॅली'चे आयोजन करण्यात आले.



या रॅलीचे आयोजन केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या पुढाकाराने करण्यात आले. शहरातील मंडीबाजार येथून सुरू झालेली ही तिरंगा रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, सदर बाजार मार्गे भगवान बाबा चौक व अखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समारोपाच्या सोहळ्यात रूपांतरित झाली.शेकडो नागरिक, विविध सामाजिक संस्था, रिटायर माजी सैनिक, युवक संघटना, विद्यार्थी, महिला व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रॅलीदरम्यान 'जय हिंद', 'भारत माता की जय' आणि 'भारतीय लष्कर अमर रहे' अशा घोषणांनी संपूर्ण शहर देशभक्तीच्या रंगात न्हालं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याआधी एका पत्रकार परिषदेत 'ऑपरेशन सिंदूर'मुळे भारताने पुन्हा एकदा सिद्ध केलं की, देशाच्या सुरक्षिततेशी कोणीही खेळ करू शकत नाही. लष्कराच्या धाडसी कारवाईमुळे भारताचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला असून, त्यांचा सन्मान करण्यासाठी राज्यभर विविध ठिकाणी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येईल, असे वक्तव्य केले होते. अंबाजोगाईतील रॅली हे त्याचेच एक उदाहरण ठरले.या रॅलीदरम्यान पोलिस प्रशासनाकडून योग्य बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संपूर्ण मार्गात वाहतूक व्यवस्था सुरळीत राखण्यात आली. शहरातील व्यापाऱ्यांनी देखील रॅलीला पाठिंबा देत काही काळासाठी दुकाने बंद ठेवून सहभाग नोंदवला.देशाच्या सुरक्षेसाठी झुंजणाऱ्या जवानांना मानवंदना देण्यासाठी अंबाजोगाईच्या जनतेनं दाखवलेला उत्साह निश्चितच प्रेरणादायक ठरला आहे. या माध्यमातून शहरात देशभक्तीचा नवा सळसळता ज्वालामुखी पेटलेला दिसला.

# जात प्रमाणपत्र पडताळणी सूचना

**बीड /प्रतिनिधी**

**राज्यातील सध्या सुरू असलेल्या सन २०२४–२०२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी वैद्यकीय आणि इतर व्यवसायिक अभ्यासक्रमा सहित) एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील जे उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत परंतु विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकलेले नाहीत. अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय दिनांक २ मे २०२५ अन्वये शासन आदेशाच्या दिनांक पासून अधिक ३ महिन्याचा कालावधी देण्यात आलेला आहे.**

आधीकचा ३ महिन्याचा कालावधी हा एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहे परंतु जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत सादर करू शकले नाहीत अशा उमेदवारासाठीच राहील. या आधीच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत अशा उमेदवारांचे प्रवेश होऊ न शकल्यास त्यास संबंधित उमेदवार जबाबदार राहतील असे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

राज्यातील सध्या सुरू असलेल्या सन २०२४–२०२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी वैद्यकीय आणि इतर व्यवसायिक अभ्यासक्रमा सहित) एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील जे उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ
सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय

# आर्मी एक दुधारी तलवार...

मित्रांनो शीर्षक वाचून आश्चर्य वाटलं ना लेख आणि शीर्षक वाचून, हो तुम्ही जे वाचलत ते खरय आणि हा लेख लिहिण्याच कारण पण तसंच आहे,

सध्या ऑपरेशन सिन्दुर बद्दल लोकांच्या मनात खूप प्रश्न आहेत. पहलगाम मध्ये पाकिस्तानी इस्लामिक आतंकवाद्यांच्या हल्यात धर्म विचारून केलेल्या निष्पाप लोकांच्या हत्या सगळ्यांच्याच मनाला इजा करून गेल्यात आणि ह्याचाच बदला घ्यायचा म्हणून ऑपरेशन सिन्दुर सुरू झालं.

ऑपरेशन सिन्दुर सुरू झाल्यापासून खूप लोकांचे मेसेज आले.फोन कॉल्स सुद्धा आले की आम्ही सगळे आर्मी (वायुसेना,नौसेना , भूदल) सोबत आहोत आणि ह्या वेळेला पाकिस्तानला त्याची जागा दाखवूनच देऊ अशा आशयाचे खूप संदेश भेटले आणि आनंद ही झाला की अशा स्थिती मधे संपूर्ण देश जात , धर्म, भाषा, प्रांत अशा विषमता डावलून आपल्या सोबत उभा आहे. आणि ह्याच शक्ती मुळे ऑपरेशन सिन्दुर यशस्वी सुद्धा झालं.भारतीय डिफेन्स ने दाखवून दिलं की जेव्हा गोष्ट आपल्या देशाच्या नागरीकांवर येते तेव्हा आम्ही जगाच्या कुठल्या ही कोपऱ्यात जाऊन दुष्मणाला पाणी पाजू शकतो ,आणि ते तुम्ही पाहिल ही असेल.

पण अचानक झालेला युद्धविराम कुणाच्या पचनीच पडत नव्हता किंबहुना माझ्या पण, आणि मग परत मित्रांचे फोन , मेसेज सुरू झाले यार,आपण ह्या युद्धात वरचढ होतो त्यांची एअर डिफेन्स सिस्टीम फोडली , जीवावर उदार होऊन सैनिकांनी पाकिस्तानात घुसून त्यांना मारलं, आणि एका मीटिंग द्वारे लगेचच कुणाच्या तरी सांगण्यावरून युद्धविराम कसा काय स्वीकारू शकता, मिलिट्रीला राग नाही का येत.आपल्या ही देशाच्या आर्मीला स्वतःचे निर्णय घ्यायची मुभा असायला हवी होती.आता पर्यंत संपूर्ण पाकिस्तान जळून राख झाला असता वैगेरे आणि काही वेळा साठी मला पण तसंच वाटत होतं पण थोडा विचार केल्या नंतर अस जाणवलं की खरच भारताचे नागरिक खूप नशिबवान आहेत ,तुम्ही तुमच्या आर्मी ला एका बोटाने नियंत्रणात ठेवलेलं आहे खूप चांगल्या पद्धतीने, विश्वास नाही बसत ना पण हे खरं आहे अप्रत्यक्षपणे तुम्हीच आमच्या वर नियंत्रण ठेवताय म्हणून तुमचं स्वातंत्र्य शाबूत आहे पटत नसेल तर बघा मग बांगलादेश ,पाकिस्तान, अफगाणिस्तान अजुन ही खूप उदाहरणे आहेत.

मित्रानो म्हणूनच मला वाटत आर्मी ही एक दुधारी तलवार आहे, नियंत्रणात आहे तोवर ठीक नाही तर मग तुमच्या स्वतःच्या धोतरा सोबत स्वतःची चामडी पण कधी जमिनीवर येईल समजणार ही नाही

आपण भारतीय म्हणूनच खूप नशिबवान आहोत की आपली आर्मी , शूर, निर्भीड,धाडसी , वीर,शक्तिशाली असण्या सोबत अनुशाशीत आणि संयमी आहे.ह्याचा पाया कुठे ना कुठे छत्रपती शिवरायांनी घालून दिलाय अस जाणवत कारण शिवरायांची सुद्धा एक शिकवण होती की रयतेच्या भाजीच्या देठाला सुद्धा इजा नाही झाली पाहिजे का ? कुणासाठी ? आणि कशासाठी लढतोय ह्याच भान असण खूप गरजेचं असतं. फौजीना प्रशिक्षणापासूनच शिकवलं जात की कस लढायच आणि कश्यासाठी लढायच.कालच्या ऊल्लज शिीशी लीळशष मध्ये , तखलशऍडमिरल प्रमोद सर ह्यांनी एका प्रश्नच उत्तर देताना अधोरेखित केलं की आपली आर्मी कुणावर आक्रमण करण्यासाठी कशावर कब्जा करण्यासाठी नसून आम्ही आपल्या देश वासियांच्या रक्षणासाठी कठीबद्ध आहोत मग आम्हाला ह्या साठी जगात कुठे ही युद्ध करण्याची वेळ आली तरी चालेल. अजून एक म्हणजे पाकिस्तान सारखा देश जिथे सैन्य सत्ता चालते अशा देशाकडे स्वतःची अशी प्रतिमाच नसते ते कुठल्याही थराला जाऊ शकतात त्यांना फक्त जिंकायचा असत त्या साठी ते कुठली ही किंमत द्यायला तयार असतात.उदाहरण घ्यायचं असेलच तर सध्याच ऑपरेशन सिन्दुर चालू असताना त्यांनी त्यांच्या सिव्हिल एअरलाइनचा वापर स्वतःची ढाल म्हणून केला किती नालायक पना असायला हवा हे करण्या साठी स्वतःच्या देशाच्या नागरिकांचा जीव त्यांनी पणाला लावला.जर आपल्या आर्मीने त्या देशाच्या निष्पाप नागरिकांचा विचार नसता केला तर ऑपरेशन सिन्दुरच्या पहिल्याच दिवशी पाकिस्तान जवळ जवळ संपूर्ण जळाला असता.पण देशातील सामान्य लोकांच्या जीवाचा प्रश्न जेव्हा येतो तेव्हा, फौजी भारतीय आर्मी वाले मग अधिकारी असो किंवा सिपाही कधीच आपल्या जीवाची पर्वा करत नाहीत.म्हणूनच आर्मी नियंत्रणात असण म्हणजे देशातील नागरिक सुरक्षित आहेत हे सिद्ध होत.अजून एक सोप्प उदाहरण म्हणजे भाऊबली सिनेमाच घ्या ना,आपली आर्मी म्हणजे बाहुबली आणि नियंत्रणात नसलेली आर्मी म्हणजे भल्लाळदेव देव असी जर कल्पना केली तर तुम्हाला चांगलच समजून येईल की ही , विध्वंसक शक्ती नियंत्रणात का असायला हवी. परत एकदा सांगू इच्छितो की युद्धविराम म्हणजे शत्र ठेवणे नाही तर थोड थांबणे असा होतो.विश्वास ठेवा पाकिस्तान च्या नालायकपणा वर ते परत नक्कीच संधी देतील आणि प्रार्थना करा की ह्या वेळेला शिशुपालाचे १०० अपराध भरले असतील

## अपूर्व अतुल मुळे याचे शालांत परीक्षेत घवघवीत यश

बीड राजयोग प्रतिनिधी

अपूर्व अतुल मुळे (आर्वीकर) भगवान शिक्षण प्रसारक मंडळाच्या भगवान विद्यालय बीड येथून शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२५ मध्ये शाळेतून सर्व द्वितीय आला आहे.

अपूर्व यास ९९.२०% गुण प्राप्त झाले. संस्कृत आणि गणित विषयांमध्ये शंभर टक्के गुण अपूर्व यास मिळाले. इयत्ता नववी मध्ये



बीडमधून राष्ट्रीय स्तराची होमी भाभा परीक्षेमध्ये तो लातूर विभागातून सर्व द्वितीय आला होता. तसेच इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये सुद्धा बीड तालुक्यातून सर्व द्वितीय होता. दररोज नियमितपणे पाच ते सहा तास स्वयंअध्ययन यावर भर दिल्यामुळे हे यश मिळाले असे अपूर्व याने सांगितले. सध्या तो लातूर येथील नामांकित राजर्षी शाहू विद्यालयामध्ये इयत्ता अकरावीचे शिक्षण घेत आहे. संस्था अध्यक्ष गोगो मिसाळ सचिव डॉक्टर अनिल कुमार सानप मुख्याध्यापक श्री अंकुश आघाव पर्यवेक्षक श्री गर्जे सर, श्री डोळे सर, श्री वडमारे सर ,श्री ठोसर सर ,बटुळे सर ,श्री शेख सर, श्रीमती सानप मॅडम ,श्रीमती पवार मॅडम, श्री तोगे सर ,श्री मैद सर, श्री केदार सर, श्री जाधव सर, श्री भोसले सर, श्री नामदास सर ,श्री सानप सर ,श्री मिसाळ सर व सर्व शिक्षक कर्मचारी यांनी अपूर्वचे अभिनंदन केले.

## धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात 'जागतिक परिचारिका दिन' साजरा

धर्माबाद ( अशोक पडोळे ):– आधुनिक नर्सिंगचा पाया रचणाऱ्या फ्लोरेन्स नाईटिंगेल यांचा १२ मे रोजी जन्मदिवस आहे. त्यांच्या स्मरणार्थ व सन्मानार्थ हा दिवस 'जागतिक परिचारिका दिन' म्हणून जगभरात (खपींशीपरींळेपरश्र छीीीशी ऊू) साजरा केला जातो. याच औचित्याने धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात गुरुवार, दि.१२ मे रोजी 'जागतिक परिचारिका दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामीण रुग्णालय ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वेणुगोपाल पंडित, डॉ. श्याम लखमावार यांच्या हस्ते फ्लोरोन्स नाइटिंगेल परिचारिका यांच्या प्रतिमेस पुष्पहार



अर्पण व अगरबत्ती ,मेणबत्ती दिप प्रज्वलन करण्यात आले. इंन्चार्ज सिस्टर शुभांगी सुर्यवंशी,जेष्ठ परिचारिका कल्पना ठाकुर, महामुनी यांनीही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

डॉक्टरांसह परिचारिकांनी रात्रंदिवस रुग्णांची सेवा करतात. कोणत्याही रुग्णाच्या आरोग्यामध्ये डॉक्टरची जितकी महत्त्वाची भूमिका असते, तितकीच महत्त्वाची भूमिका नर्सची असते. नर्स आजारी व्यक्तींची काळजी घेते. डॉक्टर दिवसभर रुग्णासोबत राहू शकत नाही. नर्स रुग्णाच्या स्थितीवर लक्ष ठेवते. परिचारिकांच्या या सेवाभावाचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाची प्रशंसा करण्यासाठी दरवर्षी जगभरात आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन दरवर्षी १२ मे रोजी साजरा केला जातो. जानेवारी १९७४ मध्ये हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. मात्र, नंतर मे महिन्यात परिचारिका दिन साजरा केला जाऊ लागला.फ्लॉरेन्स नाइटिंगेलला 'द लेडी विथ द लॅम्प' म्हणूनही ओळखले जाते. त्यांचा जन्म १२ मे १८२० रोजी इटलीमध्ये झाला. त्यांनी आयुष्यभर रुग्णांची सेवा केली. त्या काळात जगभरात आरोग्याशी संबंधित सुविधांचा तुटवडा होता. विजेचा तुटवडा असल्याने ती हातात कंदील घेऊन रुग्णालयात रुग्णांची सेवा करत होत्या.त्यांच्या परिश्रमामुळे परिचारिकांना समाजात मानाचे स्थान मिळाले. आंतरराष्ट्रीय परिचारिका परिषदेने १९७४ मध्ये आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा करण्याची घोषणा केली होती. त्या काळात परिचारिकांना किट वाटण्याचे काम आंतरराष्ट्रीय परिचारिका परिषदेकडून करण्यात आले. ते परिचारिकांच्या कामाशी निगडीत गोष्टी पाहत असायचे.अशी माहिती देण्यात आली. या वेळी रुपाली सोनटक्के , जयश्री किनेवाड,प्रिया लोणे, मिना पेदे, शिल्पा माडेवार,जेनिफर वाघमारे, प्रतिक्षा कांबळे, सह नर्सिंग चे शिक्षण घेत असलेल्या मयुरी सोनकांबळे, विद्या कांबळे,संध्याराणी कांबळे, कल्पना वाघमारे, प्रतिभा तांदुलवार, गंगोत्री शेळके, दुर्गा मदनुरे, प्रिती सोनकांबळे, मयुरी सोनकांबळे, अनुसया बोंमले, सह रुग्णालयातील अनेक कर्मचारी उपस्थित होते. तर श्रीमती मनीषा महामुनी यांनी प्रतिज्ञा वाचन केले व उपस्थित सर्वांनी सेवेची प्रतिज्ञा घेतली. इंन्चार्ज च्या वतीने अल्प उपहार , शीतपेय चे आयोजन करण्यात आले होते.

# सांगवी पाटण येथे बुद्ध विहार निर्माण करुन यावर्षी संयुक्त जयंती महोत्सव साजरा

### नाचून नाही तर पुस्तके वाचून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करा – वाल्मीक तात्या निकाळजे

प्रतिनिधी @ आष्टी

दिनांक १२ मे २०२५ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांच्या प्रतिमेची वाजत – गाजत मिरवणूक काढत संयुक्त जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सांगवी पाटण सह मुंबई व तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर, बौद्ध बांधव, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सांगवी पाटण येथील बौद्ध बांधवांचा गेल्या अनेक वर्षाचा बुद्ध विहार बांधण्याचा संकल्प यावर्षी पूर्ण झाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. सायंकाळी महापुरुषांच्या प्रतिमांची




मिरवणूक संपल्यानंतर अभिवादन सभा पार पडली. सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले. यावेळी समाजसेवक विजय गोल्हार, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे अँड. वाल्मिक निकाळजे, रिपाई तालुकाध्यक्ष अशोक साळवे, रिपाई महाराष्ट्र प्रदेश सचिव साहेबराव ससाणे, धामणगाव गटाचे नेते संजय गाढवे, मा. पं.सदस्य रावसाहेब लोखंडे, डॉ. युवराज तरटे, सरपंच दत्तात्रय खोटे, उपसरपंच राहुल खिलारे, माऊली भोसले, विजय मरकड, बाबासाहेब रंधवे, निवृत्त मेजर रावण साळवे, पत्रकार संतोष ससाणे, लक्ष्मण भोसले, दादासाहेब खिलारे, भागवत बोराडे,भरत, गणेश खिलारे, सद्दाम शेख, अन्सार शेख, दत्तात्रय खिलारे, शाहरूख शेख, अमोल राजपुरे, शेषराव नरवडे, राघव खिलारे, शशिकांत खुटाळे, संकेत भगत, कृष्णा भोसले, शशिकांत भोसले, गिताराम बोराडे, बौद्ध सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल खंडागळे, सुनिल भैरू खंडागळे, सुनिल बन्सी खंडागळे, राजू खंडागळे, पंडित खंडागळे, सोपान खंडागळे, राजेंद्र खंडागळे, अशोक खंडागळे, सतिश वाघमारे, नागेश वाघमारे, मधुकर खंडागळे, लक्ष्मण खंडागळे, आबा वाघमारे, नाना वाघमारे, संदीप खंडागळे, आश्रजी खंडागळे, पोपट धनवे, नवनाथ बोराडे, निलेश आदित्य खंडागळे, विलास खंडागळे, विकास खंडागळे, बिबीशन खंडागळे, प्रभाकर खंडागळे, कृष्णा खंडागळे, हरी खंडागळे, सुदाम खंडागळे, सुनिल बन्सी खंडागळे, आकाश बोराडे, आविनाश वाघमारे, तुषार खंडागळे, किशोर घोडके, समजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, माता भगिनी, पंचक्रोशीतील बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. ए. डी. कलकर्णी यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ४१७/२०२५**
**शालिनी विरूध्द निरंक**
**(मार्फत अँड. मेघारे एस एल. गेवराई)**

ज्या अर्थी मयत रामभाऊ पि.गणपत खरात हे दि.१४/१२/२०२४ रोजी लाईफ लाईन हॉस्पिटल, मुंबई, पी.नॉर्थ वॉर्ड मुंबई उपनगर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ शालिनी भ्र.रामभाऊ खरात, वय ७५ वर्षे, धंदा. घरकाम, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड. ह. मु. रुम नं. ९१२ घोडेवाली चाळ, अकुरली रोड, दुर्गा माता मंदीर हनुमान नरसीपाडा कांदिवली पुर्व मुंबई ४००१०१, २.राहुल पि. रामभाऊ खरात, वय. ३४ वर्षे, धंदा. व्यवसाय, रा. सदर.यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे..

सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या त्यापेक्षा हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत रामभाऊ पि. गणपत खरात यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५/०५/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.


पुढील तारीख १९/०६/२०२५

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित/–** | **आदेशावरून** |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहाय्यक अधीक्षक** |
| **दिवाणी न्यायाल,** | **दिवाणी न्यायालय,** |
| **क.स्तर,गेवराई** | **क.स्तर, गेवराई** |

### आपत्तीचा पावसाळा / ००२ वीज

# दामिनी अलर्ट .. पुढे धोका आहे..!

पाऊस आणि आकाशातील वीज याबाबत जाणून घेताना नव्या युगातील नव्या तंत्राच्या वापरातून आपला पावसाळा अधिक सुरक्षित आणि जीवन अधिक सुकर करण्याबाबतही आपण माहिती घेतली पाहिजे. आपण स्मार्टफोनचा वापर करण्यास आपण चांगल्यापैकी सरसावलो आहोत त्यामुळे त्याच्या विविध अप्लिकेशनच्या माध्यमातून आपण उत्तम असे सुरक्षा चक्र तयार करू शकतो.दामिनी मराठी शब्दकोषात आपण नजर टाकली तर मराठीतच विजेला कितीतरी शब्द आपणास सापडतील.विजेला सर्वात अधिक परिचित असणारा आपला शब्द म्हणजे विद्युल्लता होय, याला आणखी नावे म्हणजे चपला, (गतीमुळे), चंचला (अस्थिर वृत्तीमुळे), दामिनी, सौदामिनी, बिजोरी तसेच क्षणप्रभा (अल्प चमक)आता कितीही शब्द याचे वर्णन करता येईल आणि त्याने होणारा अर्थ विविध प्रकारे त्याची तीव्रता स्पष्ट करणारा आहे.भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने हे प सर्वांसाठी विकसित केले आहे. भारत हा उष्णकटिबंधातील देश असल्याने येथे ७० टक्के वीज पडण्याची नोंद आहे. यामुळेच यातून प्राणहानी टाळण्यासाठी हे प्लीकेशन विकसित केले आहे.



आपण जिथे आहोत त्या जागेच्या ४० किलोमीटर परीघ क्षेत्रात कोणकोणत्या ठिकाणी आकाशात वीज तयार झाली आहे, याची नकाशासह माहिती देण्यासोबत पुढील २५ मिनिटांमध्ये साधारण ७ मिनिटे, २४ मिनिटे आणि २१ मिनिटांनी वीज कोसळण्याची शक्यता असलेले ठिकाण यावर आपणास दिसते. ही माहिती उपग्रहाच्या मदतीने सातत्याने अद्यावत अपडेट होत असते. याचा वापर प्रत्येक व्यक्तीने केल्यास वीज कोसळून होणारे मृत्यू कमी होण्यास मदत होणार आहे.

अँड्रॉइड फोन धारकांसाठी हे प गुगल प्ले स्टोअर वर नि:शुल्क उपलब्ध आहे. या प साठी देशात ८३ ठिकाणी लाइटनिंग लोकेशन नेटवर्क उभारण्यात आले आहे. याचा प्रोसेसर खखढच् (पुणे) या संस्थेत आहे. या ८३ ठिकाणावरून येणाऱ्या माहितीचे विश्लेषण व त्यावर प्रक्रिया करून ५०० मीटर इतक्या अचूक अंतरात संभाव्य वीज कोसळण्यात ठिकाण ओळखून ते यावर दाखवले जाते.व्यक्ती आपल्या जीपीएस लोकेशनच्या आधारे आपल्या ठिकाणापासून २० ते ४० किलोमीटर परिघात वीज पडणार की नाही याची माहिती प्राप्त करू शकतो. ऊाळपळ डळसहीं–पळपस –श्रर्शीं हे आपण डाऊनलोड करून मोबाईल इन्स्टॉल करावे यासाठी शुल्क नाही. कुणालाही हे वापरता येते. ज्यांना यात स्वतःची नोंदणी करायची आहे त्यांना ती ठरसळींशी पर्यायावर जाऊन नाव, मोबाईल क्रमांक, पिन कोड तसेच व्यवसाय ही माहिती देवून नोंद करता येते. सध्या देशातील १० लाखावर अधिक जण हे वापरत आहेत. स्वतःवर आणि स्वतःच्या कुटुंबावर प्रेम करणारा प्रत्येक व्यक्तीने हे आप वापरल्यास विजेमुळे होणारी प्राणहानी आपण रोखू शकतो.

हवामान अंदाज

भारतीय हवामान खाते आपल्या द ( पूर्वीचे ट्विटर )आणि इतर सोशल नेटवर्क देखील २४ तासांपासून पुढील ५ दिवसापर्यंत हवामानाचा अंदाज देते. याची माहिती वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे तसेच रेडिओवर देखील वेळोवेळी देण्यात येत असते.

गंभीर (रेड), टाळू नका (ऑरेंज), लक्ष ठेवा (येलो), असे विविध रंगी अलर्ट तापमान व पर्जन्यमानाबाबत सातत्याने दिले जातात. त्याकडे आपण देखील तितक्याच गांभीर्याने बघितले पाहिजे. पाश्चिमात्य देशात घरातून बाहेर पडण्यापूर्वी प्रत्येक व्यक्ती हवामानाचा अंदाज बघून बाहेर पडते आणि घराबाहेर असेपर्यंत त्याबाबत जारी होणाऱ्या अद्यावत सूचनावर लक्ष ठेवून असते.भारतीय– पाक तणावात ब्लॅक आऊट कसा असतो हे बघायला बाहेर पडणारे आपले युवक त्याचेही फोटो काढत रस्त्यावर गर्दी करून होते हे ताजे दृश्य आपण बघितले आहे. यापूर्वी कोरोना काळात लॉकडाऊन मध्ये संचारबंदी कशी असते असे बघणारे आणि पोलिसी पाहुणचार व दंडुक्याचा प्रसाद घेणारे विसरलेलो नाही. मुळात आपण गंभीर असणे आवश्यक आहे. कारण

.ये जिंदगी का ये जिंदगी ना मिलेगी दोबारा करताय मग ॲप डाऊनलोड

प्रशांत विजया अनंत दैठणकर
(जिल्हा माहिती अधिकारी)
बीड चलभाषा क्र. ९८२३१९९४६६

# राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता

### आपली मुलं जिल्हा परिषद शाळेत शिकवावे असा संदेश मनसेचे कैलास दरेकर यांनी फलकातून दिला

प्रतिनिधी @ आष्टी

येथील जगदंबा माता मंदिरात मा. राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनसेचे कैलास दरेकर आयोजित अखंड पंचदिनी हरिनाम सप्ताहाची ह. भ. प. बाळासाहेब शिंदे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. पंचदिनी सप्ताह काळात वेगवेगळ्या विषयांवर विविध नामवंत कीर्तनकारांकडून समाजप्रबोधन करण्यात आले. तसेच आपल्या मातृभाषेत शिक्षण प्रगतीचे लक्षण या प्रकाराचे फलक लावून आपले मुलं जिल्हा परिषद शाळेत शिकवावे असा



संदेश मनसेचे कैलास दरेकर यांनी फलकातून दिला.

शिंदे महाराज यांनी कीर्तनातून आईवडिलांचा सांभाळ करावा, असे आवाहन केले. आईवडिलांची सेवा हाच धर्म असल्याचे त्यांनी सांगितले. डोळस महाराजांनी भगवान श्रीकृष्णाने अवतार घेतल्यापासून बालपणी केलेल्या लीलांचे वर्णन त्याचप्रमाणे अवतार संपेपर्यंत जीवनप्रवासावर प्रबोधन केले. आष्टी येथील सप्ताह समितीचे आयोजक कैलास दरेकर यांनी शिंदे महाराज यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी व जगदंबा तरूण मंडळाच्या सहकार्याने दहीहंडीच्या कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता करण्यात आल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले होते.

## आईच्या वाढदिवसानिमित्त 'लेकीची' अनोखी 'गिफ्ट'

### दहावी बोर्ड परीक्षेत कु.सिध्दी चाटे रेसिडेन्शिअल विद्यालयातून अव्वल

प्रतिनिधी @ आष्टी

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या मार्च २०२५ च्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून जाहीर झाला. यात शेवगाव येथील रेसिडेन्सीयल हायस्कूल



अँड ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कु. सिद्धी बिभिषण चाटे ही ९६.६० टक्के गुण घेत अव्वल ठरली आहे. तिने विद्यालयातून मुलींमध्ये प्रथम येण्याचा सन्मान प्राप्त केला आहे. मागासवर्गीयातूनही सर्वद्वितीय तसेच इंग्रजी विषयात तब्बल ९७ टक्के गुण घेऊन प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. विशेष म्हणजे आई शिक्षिका आशा बिभिषण चाटे यांच्या वाढदिवसानिमित्त ही गिफ्ट ठरली आहे. रेसिडेन्सीअल हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज मधून यंदा ४०० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. विद्यालयाचा ९४ टक्के निकाल लागला असून कु. सिद्धी बिभिषण चाटे हिने ९६.६० टक्के गुण संपादन करून मुलींमध्ये सर्व प्रथम येण्याचा मान मिळवला आहे.

कु. सिद्धी चाटे ही इंग्रजी विषयात ९७ गुण घेत विद्यालयातून सर्वप्रथम आली आहे. विद्यालयाच्या गुणाक्रमे मुलींच्या यादीतही ती विद्यालयातून प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली आहे. कु. सिद्धी चाटे हिची उत्कृष्ट बाल गायिका म्हणून लोकप्रियता आहे. शिस्तप्रिय विद्यार्थिनी तसेच शिक्षक दिनानिमित्त उपमुख्याध्यापक म्हणून तीने उत्कृष्ट कर्तव्य निभावले आहे. मंथन आणि शिष्यवृत्ती परीक्षेतही ती पात्र ठरलेले आहे. कु. सिद्धी चाटे हिच्या यशाबद्दल प्राचार्य बालाजी गायकवाड, प्राचार्य रायते, पर्यवेक्षक मकासरे, वर्गशिक्षक संतोष मिसाळ आदी सह सर्व शिक्षक वृंदांनी अभिनंदन केले आहे.

## मांजरसुंबा येथील डॉ. पारनेरकर महाराज विद्यालयातील विद्यार्थिनी मैथिली महादेव कोळी हीचे सर्वत्र कौतुक



प्रतिनिधी @ बीड

१३ मे रोजी इयत्ता दहावीच्या निकालामध्ये कु. मैथिली (निशा) महादेव कोळी हिने वर्षभर मेहनतीने अभ्यास करून विद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला, तिला ९३.४० टक्के मिळविले , याबद्दल तिचे वडील व आई अश्विनी महादेव कोळी तसेच कुटुंबातील सर्वांनीच तिचे कौतुक केले,त्याच बरोबर मांजरसुंबा ग्रामस्थ यांनी देखील तिचे भरभरून कौतुक केले.विशेष म्हणजे भारतीय आदिवासी कोळी सेना बिड जिल्हा अध्यक्ष मुकुंद कमळे यांनी देखील फोन द्वारे तिला शुभेच्छा दिल्या.

# पंडीत नेहरू शाळेने पाच वर्षापासूनची १०० टक्के निकालाची परंपरा कायम जपली

## बारा विद्यार्थ्यांनी घेतली उत्तुंग गरुडझेप

प्रतिनिधी @ आष्टी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत घेण्यात आलेल्या एस. एस. सी. परीक्षेचा निकाल नुकताच प्रसिद्ध झाला असून यामध्ये आष्टी येथील शेतकरी शिक्षण संस्था संचलित आष्टी शहरातील पंडीत जवाहरलाल नेहरु विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी याही वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली असून मागिल ५ वर्षापासून ही शाळा शंभर नंबरी ठरत आहे. या शाळेतुन १८८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती ते सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याचे कर्तव्यदक्ष प्राचार्य सुरेश बोडखे यांनी सांगीतले. पं. नेहरू विद्यालयाने १० वी. बोर्ड परीक्षेत यशाची परंपरा कायम राखली आहे. १२ विद्यार्थ्यांनी उत्तुंग गरुडझेप घेतली आहे.

आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पंडीत जवाहरलाल नेहरू माध्यमिक विद्यालयाने १० वी. बोर्ड परीक्षेत याही वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १० वी. बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला आहे. पंडीत नेहरू माध्यमिक विद्यालयाचे १८८ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९० ते १०० टक्के गुण संपादन करणारे ५९ विद्यार्थी, ८० ते ९० टक्के गुण संपादन करणारे ५६ विद्यार्थी, ७० ते ८० टक्के गुण संपादन करणारे ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याचे प्राचार्य सुरेश बोडखे यांनी सांगीतले.

आदित्य सुरेश बोडखे १०० टक्के, आदित्य रविंद हुमे १०० टक्के, कु. वैष्णवी बापूराव कुत्तरवाडे १०० टक्के (समान गुण सर्वप्रथम) कु. समृध्दी चंद्रकांत बन्सोडे ९९.४० टक्के (व्दितीय) कु. पवार गौरी प्रविण ९९ टक्के (तृतीय), कु. तनिष्का प्रदिप धोंडे ९८.८० टक्के, सोहम अशोक फुंदे ९८.६० टक्के, ओमकार सुभाष गिरी ९८.६० टक्के, कु. वृषाली लक्ष्मण टकले ९८.६० टक्के, कु. भक्ती मोहन झगडे ९८.४० टक्के, विश्वप्रताप अशोक सिरसाट ९८.२० टक्के, कु. प्राजक्ता ज्ञानेश्वर राऊत ९८ टक्के, सिध्दि चंद्रकांत बन्सोडे ९६.६० टक्के गुण संपादन करून यशाची गरूड झेप घेतली आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब, डॉ. अजय (दादा) धोंडे, अभयराजे धोंडे, जेष्ठ संचालक विठ्ठलराव आण्णा बनसोडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत सर, प्रा. शिवदास विधाते सर, माऊली बोडखे सर, दत्तात्रय गिलचे सर, संजय शेंडे सर तसेच पंडीत शाळेचे प्राचार्य सुरेश बोडखे सर यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणा-या शिक्षकांचे अभिनंदन केले व गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षक बंधू - भगिनींचे विशेष अभिनंदन केले.



# खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमीपूजन ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या शुभहस्ते होणार

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेची गंगोत्री आणि राष्ट्रीय शिक्षणासाठी विचार रूजविणारी शाळा म्हणून सुपरिचित असणा-या खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील माध्यमिक विद्यालयाच्या नवीन वास्तूच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम शनिवार, दि.१७ मे २०२५ रोजी स.८:३० वा. ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या शुभहस्ते होणार आहे. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या भूमीपूजन सोहळ्यासाठी केंद्रीय कार्यकारिणीचे सर्व सदस्य, संस्थेचे सन्माननीय सभासद,स्थानिक समन्वय समितीचे सर्व सदस्य, शालेय समितीचे सर्व सदस्य,शिक्षक,पत्रकार, पालक उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या सर्व हितचिंतकांनी या कार्यक्रमास यावे असे आवाहन खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ.कल्पनाताई चौसाळकर,रामभाऊ कुलकर्णी, अविनाश तळणीकर,वर्षाताई मुंडे,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी,तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनो स्वत:चा मार्ग स्वत: निवडा केंद्र प्रमुख श्री.संजय चवरे यांचे आवाहन

प्रतिनिधी @ केज

बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचालित,साने गुरुजी निवासी विद्यालयात दि.१५ मे २०२५ रोजी इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत शाळेतून प्रथम, व्दितीय,तृतीयआलेल्या विद्यार्थ्यांचा व ९०टक्के पेक्षा जास्त गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालया च्या प्राचार्य कविता कराड मॅडम व प्रमुख पाहुणे केंद्रप्रमुख श्री. संजय चवरे सर होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री.संदीप मांजरमे सर(एपीआय) केज पोलीस स्टेशन हे होते.तसेच वस्तीगृह अधिक्षकश्री.चाटे.बी.पी सर यांनी आपलेमनोगत व्यक्त केले.प्रमुखपाहुणे म्हणून बोलतांना श्री. संजय चवरे सर म्हणाले कि दहा वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर आपण शिक्षणातला पहिला टप्पा पूर्ण केला आहे. पुढील शिक्षणासाठी योग्य दिशा ठरवणे गरजेचे आहे.स्वतःचा मार्ग स्वतः निवडा. कारण एकदा दिशा चुकली तर करियरचा प्रश्न उभा राहतो.तेव्हा अचूक दिशा निवडा फक्त डॉक्टर,इंजिनियर याकडे न जात अनेक विविध संधी उपलब्ध आहेत.सध्या बीड जिल्ह्यातून आयएएस साठी चार मुले पात्र ठरले आहेत.तेव्हास्पर्धा परीक्षाचे क्षेत्र निवडले तर चांगले ठरते.जसा महाराष्ट्रात मुलींच्या निकालाचा टक्काजास्त आहे.तसाच या विद्यालयात सुद्धा मुलींचा गुणवत्तेतील टक्का जास्त आहे.तरी त्यांच्या पालकांनी मुलीना त्यांच्या पायावर उभा करावे.लवकर लग्न न करता त्यांना संसारात अडकवु नये आताच आपल्या समोर भारत पाकिस्तान युद्धा तील कर्नल सोफिया कुरेशी,युमिका सिंग यांनी ऑपरेशन सिंदूर या युद्धाचे नेतृत्व केले म्हणजेच



महिला सुद्धा कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत त्यांना संधी दिल्यास त्या संधीचेसोने करतात.विद्यार्थ्यांना बोलत असताना मित्र, नातेवाईक यांनी एखादे क्षेत्र निवडले म्हणून तुम्ही ते क्षेत्र निवडू नका आपल्या अंगी असणाऱ्या कौशल्याला वाव द्या म्हणजे निश्चित तुम्ही यशस्वी व्हाल. यापुढे सरकारी नोकऱ्या नाहीतत्यामुळे स्वःतच्या करियरचा मार्ग स्वतः निवडा शाळेबद्दल बोलतांना उपक्रमशील शाळा,गुणवंत शाळा, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कौशल्यांना वाव देणारी शाळा असे गौरव उद्गार काढले.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री.संदीप मांजरमे साहेब म्हणाले कि, विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षां कडे वळावे स्पर्धा परीक्षातून

पीएसआय पासून ते वर्ग एक पर्यंत अनेक नोकऱ्या उपलब्ध आहेत.स्पर्धा परीक्षांचा मार्ग निवडल्यास योग्य राहील.विद्यार्थ्यांनाभावी शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.तसेच चाटे बी.पी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी विद्यार्थ्यांचा पालकां सोबत प्रमुखअतिथीं च्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.कविता कराड मॅडम यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालया च्या शिक्षिका श्रीमती कांदे मॅडम यांनी केले. आभार प्रदर्शन चोले सर यांनी केले सदरील कार्यक्रमास गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

# सेवा सहकारी सोसायटी जवळबनच्या चेअरमनपदी नितीन भाकरे

प्रतिनिधी @ केज

## तर व्हाईस चेअरमनपदी गणेश करपे यांची बिनविरोध निवड

सेवा सहकारीसोसायटी मर्यादित जवळबन ता. केजजि.बीड या संस्थेच्या चेअरमनपदी नितीन अर्जुन भाकरे व्हाईस चेअरमन गणेश विठ्ठल करपे यांची बिन विरोध निवड करण्यात आली.सदर निवड सहाय्यक निबंधक सहकारी संस्था केज कार्यालयातील श्रीमती एम.एस.वाहवळे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम काम केले,तसेच त्यांना सहकार्य म्हणून संस्थेचे सचिव बी.बी.जाधव यांनी कामकाज पाहिले यावेळी अंबासाखर कारखान्याचे चेअरमन रमेशरावजी आडसकर व कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन अंकुशराव इंगळे यांनी चेअरमन व सदस्य यांचा सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.





# किसान सभेच्या शाखेचे जोरदार उदघाटन

प्रतिनिधी @ परळी

पीक विमा प्रश्नासह शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या किसान सभेचे गुरुवार दि १५ रोजी वांगी(बु)या गावात गाव शाखेचे उदघाटन संपन्न झाले. या प्रसंगी गावात पाहुण्यांचे स्वागत शेकडो शेतकऱ्यांनी केले.महाराष्ट्र राज्य किसान सभा मागील अनेकवर्षांपासून शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्नावर गल्ली ते दिल्ली लढा देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात यशस्वी होत आहे. किसान सभा आपले प्रश्न सोडवू शकते असा विश्वास जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये आता निर्माण होत आहे. हमीभाव, विमा प्रश्न, अतिवृष्टी अनुदान या शेतकरी आणि शेती प्रश्नांवर रस्त्यावरील लढाई, कायदेशीर लढाई सर्वच पद्धतीने लढा देत शेतकऱ्यांना कष्टाचे मोल मिळवुन देणाऱ्या किसान सभेबद्दल शेतकऱ्यांमध्ये आस्था निर्माण होत आहे.

गुरुवार दि १५ रोजी परळी तालुक्यातील सीमेवर असलेल्या - वांगी(बु) या ठिकाणी शेतकऱ्यांनी एकत्र येत किसान सभेची गाव शाखा स्थापन केली.या प्रसंगी किसान सभेचे नेते कॉ. अजय बुरांडे, कॉ. दत्ता काका डाके, कॉ. बालाजी कडबाने यांचे शेकडो शेतकरी आणि गावकऱ्यांनी ढोल, हलकीच्या गजरात मिरवणूक काढून स्वागत केले. या गाव शाखा उद्घाटन प्रसंगी कॉ. गजानन जाधव,कॉ. पांडुरंग जाधव,कॉ. अर्जुन जाधव,कॉ. अंकुश ढेबरे, कॉ.सतीश गरड,कॉ.विशाल गरड,कॉ.भास्कर गरड,कॉ.नारायण ढेबरे,कॉ.आबाजी मोहिते,कॉ.मारोती नरके,कॉ.योगेश जाधव यांच्यासह शेकडो तरुण शेतकरी, गावकरी उपस्थित होते.

# कर्तव्यदक्ष आ.सुरेश धस यांच्या मागणीला यश आष्टी एसटी महामंडळामध्ये पाच लालपरी दाखल

प्रतिनिधी @ आष्टी

## नवीन दाखल झालेल्या पाच लालपरींमुळे आष्टी आगाराला मिळेल ऊर्जा - नगराध्यक्ष जिया बेग

राज्य मार्ग परिवहन महामंडळ आष्टी आगाराचे दररोजचे सात ते आठ लाख रुपये लाख उत्पन्न असूनही आष्टी आगारातील अर्ध्याहून अधिक बस दहा वर्षाच्या पुढच्या असून बसेस या वय संपलेल्या असूनही सेवेत आहेत, त्यामुळे नविन बस नसल्यामुळे लांब पल्ल्यांच्या बस सेवा सुरू करता येत नव्हत्या. त्यामुळे प्रवाशांची होणारी हेळसांड पाहता आ. सुरेश धस यांनी परिवहन मंत्री आणि महाव्यवस्थापक यांच्याकडे सतत पाठपुरावा केल्यामुळे आष्टी आगाराच्या ताफ्यात पाच नवीन लालपरी बसेस दाखल झाल्या आहेत. त्यामुळे आगाराला नवीन ऊर्जा मिळणार आहे असे प्रतिपादन आष्टी नगरपंचायत चे नगराध्यक्ष जिया बेग यांनी केले.

आष्टी येथील परिवहन महामंडळ आगारामध्ये नवीन पाच लालपरी बसेस दाखल झाल्या आहेत. त्यांचे स्वागत करताना ते बोलत होते. यावेळी वाहतूक नियंत्रक हर्षद गुगळे, मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेट चे उपाध्यक्ष गणेश नाना शिंदे, नगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, मा. जि. प. सदस्य खंडू जाधव, अजित मुळे, नगरसेवक ज्ञानदेव



राऊत, प्रवीण कदम, शमशोद्दीन, नगरसेवक सुरेश वारंगुळे, नगरसेवक श्याम वाल्हेकर, आष्टी तालुका पत्रकार संघ अध्यक्ष प्रविण पोकळे, पत्रकार शरद रेडेकर, रघुनाथ कर्डीले, गणेश दळवी, सचिन रानडे, आगार व्यवस्थापक चोथमल साहेब, वाहक सचिन काळे, मुख्तार तांबोळी, के. जी. गव्हाणे, राजेंद्र बांगर, रघुनाथ ससाणे, शरद झांबरे, बाबू कुरेशी आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना जिया बेग म्हणाले आमदार सुरेश धस यांनी आष्टीच्या आगाराकडे सतत लक्ष दिलेले आहे. मध्यंतरी त्यांनी स्वखर्चातून टायर चेंज मशीन आगारासाठी भेट दिलेलि आहे. आता या नवीन बसेस आल्यामुळे लांब पल्ल्यांच्या प्रवासासाठी जाणाऱ्या प्रवाशांची हेळसांड थांबेल असा विश्वास व्यक्त केला. आष्टीच्या आगारातील निम्म्याहून अधिक बसेस जुन्या झाल्याने प्रवाशांचे हाल होत असल्याच्या तक्रारी येत असल्यामुळे आ. सुरेश धस यांनी परिवहन मंत्री, महाव्यवस्थापक या महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधल्यानंतर एसटी महामंडळाने तातडीने हालचाली सुरू केल्या आणि आष्टी आगारासाठी अत्याधुनिक अशा पाच नवीन बीएस - ६ गाड्या आज गुरुवारी (१५ मे) दुपारी आगारात दाखल झाल्या. या पाच लालपरी बसेसच्या स्वागत करण्यात आले तर प्रवाशी चालक - वाहक व आगारातील कर्मचारी यांनी आ. सुरेश धस यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले. आष्टी आगारात आज दुपारपर्यंत बीएस - ६ प्रकारच्या पाच नव्या गाड्या दाखल झाल्या असून, या गाड्यांच्या आगमनानंतर आष्टीकर नागरिक व प्रवाशांच्या वतीने नवीन लाल पऱ्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी या पाच ही लालपरींची आष्टी शहरातून फेरी आयोजित करण्यात आली.

# मान्सून पुर्व स्वच्छता कामा बाबत परळी नगर परिषद ॲक्शन मोडवर

## परळी नगर परिषदच्या स्वच्छता विभागाकडुन मान्सुन पुर्व स्वच्छता कामांना वेग

शहरातील मोठ्या नाल्यांची साफसफाई सुरू, नागरीकांनी सहकार्य करावे - मुख्याधिकारी

प्रतिनिधी । परळी

शहरात मान्सून पुर्व स्वच्छता कामा बाबत परळी नगर परिषद अक्शन मोडवर आली आहे. स्वच्छतासह मोठ्या नाल्यांची साफसफाई मोहिम सुरू झाली आहे. नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन, कचरा आणि गाळ नाल्यात टाकू नये, जेणेकरून पावसाळ्यात पाणी व्यवस्थित रस्ता मिळवू शकेल आणि शहरात पूर येण्याची शक्यता कमी होईल. परळी नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाकडुन मान्सुन पुर्व स्वच्छता कामांना गती देण्यात आली आहे. जे.से.बी., ट्रॅक्टर आदी मशनरीसह स्वतंत्र मजुरांची नियुक्ती करुन साफसफई करण्यात येत आहे. यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे



असे आवाहन मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांनी केले आहे.

शहरात पावसाळापूर्व स्वच्छता कामाना गती दिली आहे. शहरात अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये पाणी साचल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण व्हायची आशा ठिकाणी स्वच्छता सुरू करण्यात आली आहे. नगरपरिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे क्शन मोडर आले आहेत. मान्सून पूर्व शहरातील नाले सफाईवर प्रशासनाने जोर दिला आहे.

शहरातील अनेक नाल्यांमध्ये गाळ काढण्याचे काम व सफाई नगर परिषदद्वारे करण्यात येत आहेत.

नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, उपमुख्यधिकारी संतोष रोडे व स्वच्छता विभाग शंकर साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विभागातील विलास केदारी, सुरेश वाल्मिकी, राजाभाऊ जगतकर, राजाभाऊ गायकवाड, जेसीबी चालक सिद्धार्थ कसबे, धनराज कसबे व सर्व अधिकारी आणि कर्मचार्यांच्या सहकार्याने पावसाळापूर्व कामे हाती घेण्यात आली आहेत. पावसाळयात शहरातील मोठे नाले आणि नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी येणार नाही. नागरीकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

शहरातील उखळवेस ते सिमेंट फेक्ट्री, सरस्वती नदी गोपाळ टॉकीज ते सार्वजनिक समशान भूमी मलिकपुरा, पंचायत समिती नाथ रोड ते घरणीकर रोड, घरणीकर रोड ते हमालवाडी, साई नगर, सोमेश्वर नगर ते शारदा नगर, काळरात्री मंदिर ते घनशी नदी तसेच विविध भागातील नाल्या यासह शहरातील विविध छोट्या मोठ्या नाल्यांमधील गाळ व कचरा काढण्यात येत आहे. यासाठी दोन जेसीबी, सहा ट्रॅक्टरद्वारे व कर्मचार्यांच्यासह्याने साफसफई करण्यात येत आहे. पावसाळा सुरु होई पर्यन्त ही साफसफाई करण्यात येणार असुन या काळात शहरातील ज्या नाल्या तुंबल्या आहेत. त्यातील गाळ काढण्यात येणार आहेत. नागरिकांनी त्यांच्या परिसरातील स्वच्छता राखण्यासाठी योगदान देणे आवश्यक आहे. तसेच, कचरा व्यवस्थापनाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. नागरिकांनी नाल्यांमध्ये कचरा आणि गाळ टाकू नये. तसेच, नाल्यांच्या परिसराची स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करावे व नागरिकांनी आपला कचरा घंटागाडी मध्ये टाकावा असे आवाहन परळी नगर परिषदच्या स्वच्छता विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ९०.४० % गुण मिळवत मानसी सचिन शहागडकर हिचे दहावीत घवघवीत यश



बीड (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (डडउ) परीक्षेत बीड येथील संस्कार विद्यालयाची विद्यार्थिनी कु. मानसी सचिन शहागडकर हिने ९०.४० % गुण मिळवत प्रथम येवून घवघवीत यश संपादन केले आहे.

मानसी च्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे. ती लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असून तिने विविध शिकवणी मध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिच्या या यशामागे तिची चिकाटी, मेहनत, पालकांचे मार्गदर्शन व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगण्यात येत आहे.जयदत्त आणा शीरसागर, अनीलदादा जगताप, राजेंद्र मस्के,

सर्जराव तांदळे, नवनाथ आणा शिराळे,प्रोफेशनल क्लासेस चेरमन अध्यक्ष पवार सर यांच्या सह शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहर धोंडे यांनी मानसी चे अभिनंदन करून तीला पुढील शैक्षणिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या तर संस्कार विदयालयचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदांनी मानसी चे अभिनंदन करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मा जि प सदस्य रामदास बडे यांना मातृशोक

प्रतिनिधी @ मानुर

लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचे विश्वासू असलेले पिंपळनेर जिल्हा परिषद गटाचे मा जिल्हा परिषद सदस्य रामदास बडे यांच्या मातोश्री कै कमलाबाई अर्जुन बडे यांचे वयाच्या ७२ वर्षी निधन झाले त्यांच्यावर मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले .



अत्यंत शांत स्वभावाच्या असलेल्या कै कमलाबाई अर्जुन बडे यांची मानूर परिसरात मोठी ख्याती होती बुधवार १४ मे रोजी रात्री त्यांचे निधन झाले त्यांच्या निधनाने परिसरात मोठी शोककळा पसरली होती. त्यांच्या मागे ४ मुले एक मुलगी सुना नातवंडे असा मोठा परिवार असून दि. १५ मे गुरूवार रोजी ठिक सकाळी १० वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी माजी आमदार भिमराव धोंडे तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील अनेक गणमान्य व्यक्ती व संपूर्ण मानूर पंचक्रोशी उपस्थित होती. कै कमलाबाई अर्जुन बडे यांचा दशक्रिया विधी दि. २४ मे शनिवार रोजी नागनाथ मंदिराच्या पाठीमागे सकाळी ठीक ८ वाजता होणार आहे..

# राजनंदिनी पाटील हीने मिळवले संस्कृत मध्ये १०० तर इंग्रजी मध्ये ९६ गुण

## पत्रकार रमाकांत पाटील यांची मुलगी राजनंदिनीने सिध्द केली शैक्षणिक गुणवत्ता

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

नुकत्याच झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत येथील दैनिक सामना या वर्तमानपत्राचे तालुका प्रतिनिधी तथा प्रसिध्द एलआयसी अभिकर्ता पत्रकार रमाकांत पाटील यांची मुलगी राजनंदिनी हीने आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करीत उज्वल यश प्राप्त केले आहे. तिच्या या अलौकिक यशाबद्दल राजनंदिनी आणि वडील रमाकांत पाटील यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई येथील दहावी वर्गात सेमी इंग्रजी मध्ये शिकणारी व गीतेचा पंधरावा अध्याय मुखपाठ असणारी विद्यार्थीनी कु.राजनंदिनी रमाकांत पाटील हीने दहावी बोर्डाच्या परीक्षेत ९३.४० टक्के गुण प्राप्त केले असून इंग्रजी विषया मध्ये १०० पैकी ९६ तर संस्कृत मध्ये १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत. सदरील यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. विद्यार्थीनी कु.राजनंदिनी रमाकांत पाटील हीचे शाळेचे मुख्याध्यापक विवेक जोशी, दहावी विभागप्रमुख कल्पना जवळगावकर, ज्ञानोबा सावंत, अश्विन पाटील, किरण पाटील, सृष्टी



शिंदे, शशिकांत गोरटे, अरूण पाटील, प्रकाश गोरटे, कंगळे शैलेश, संस्कृत विषयाच्या गाढ्या अभ्यासिका सौ.सुचिता कंगळे, नारायण काकडे, राजवीर पाटील, बालासाहेब चिल्लरगे, संजय बर्दापूरकर, सुनिल मुंदडा, सुनिल चव्हाण, डॉ.अनिल मस्के, उपअधिष्ठाता डॉ.राजेश कचरे, डॉ.विलास शिंदे, शासनमान्य कंत्राटदार मुकुंद काळदाते, नासेर पठाण यांच्यासह पत्रकार बांधव, नातेवाईक, मित्र परिवार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक केले आहे.

# चौसाळा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी



## विविध जाती धर्मातील ५१ रक्तदात्यानी केले रक्तदान

चौसाळा /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची सार्वजनिक जयंती मोठया उत्साहात व विविध समाजउपयोगी कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली.

सकाळी १० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक भव्य अभिवादन सभा आयोजित केली होती. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विवेक (बाबा) कुचेकर यांच्या शुभहस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी असंख्य मावळे मोठया संख्यंने उपस्थीत होते. सकाळी ११ वाजता चौसाळा शहरातुन भव्य मोटार सायकल रेली काढण्यात आली. ही रॅली चौसाळा बायपास येथिल धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकात देखील अभिवादन करण्यात आले. यावेळी कृषी उत्तपन्न बाजार समिती बीडचे संचालक दिपक (भाऊ) काळे, सुधाकर गुंजाळ, सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर, सुरज सोनवणे, धर्मवीर संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे संस्थापक प्रदीप जोगदंड, जयंती अध्यक्ष समर्थ शिंदे, उपाध्यक्ष बबलू शिंदे, सचिव आदीत्य हावळे, कोषाध्यक्ष आमोल कांबळे ईत्यादी मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तर ११-३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी विविध जाती धर्मातील ५१ रक्तदात्यानी रक्तदान केले. तर संध्याकाळी ०५ वाजता हनुमान मंदीर चौसाळा येथुन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकत प्रमुख आकर्षण आहील्यानगर जिल्हयातील कर्जत येथिल स्वरसंगम बॅन्जो व धाराशिव जिल्हयातील वाशी तालुक्यातील तांदळवाडी येथील भव्य रथ हे प्रमुख आकर्षण होते. तर या मिरवणुकी दरम्यान चौसाळा शहरातील प्रत्येक महापुरुषांच्या चौकाला पुष्पहार अर्पण करण्यात आले. या मिरवणुकीत प्रत्येक जाती धर्मातील मोठया संख्येने सामील झाले होते हा जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी संदेश खिवसंरा, अंगद शिंदे, विजयराजे शिंदे, अतुल भैय्या शिंदे, मधुकर तोडकर, राजेश (अप्पा)नाईकवाडे, तुकाराम जोगदंड, नानासाहेब शिंदे,सुधाकर गुंजाळ,सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे संस्थापक प्रदीप (भाऊ)जोगदंड, यांच्या मार्गदर्शनाखाली हा जयंती सोहळा मोठया उत्साहात पार पडला यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष समर्थ शिंदे, उपाध्यक्ष बबलू शिंदे,

# पूर्वा खडकेचे शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यश



प्रतिनिधी @ माजलगांव

सिद्धेश्वर शाळेतील विद्यार्थिनी पूर्वा प्रशांत खडके हिने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९३.८० टक्के गुण घेत घवघवीत यश मिळवले आहे. फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कु. पूर्वा प्रशांत खडके हिने ९३.८०% गुण मिळविले आहेत. तिच्या यशाबद्दल मुख्याध्यापक संतोष लिंबकर, ॲड. भानुदास डक, लक्ष्मणराव जगताप, बी. एन. कुलकर्णी, दत्ता काळे, राजेंद्र भिलेगावकर, अनंत शास्त्री जोशी, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, कमलेश जाब्रस, दत्ता येवले, महेंद्र मस्के, पुरुषोत्तम शर्मा, आनंद डाके, सचिन रुद्रवार, रमेश गिरी, आनंत शेजुळ यांचेसह सर्व शिक्षक वृंद व मित्र परिवाराच्या वतीने अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित,

## स्व.प्रमोद महाजन कला व विज्ञान महाविद्यालयाचा १०० टक्के निकालासह उज्वल यशाची परंपरा कायम



प्रतिनिधी @ केज

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्व.प्रमोद महाजन कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मार्च-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एच.एस.सी. बोर्ड परिक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले.यामहाविद्यालयाचीविद्यार्थीनी कु.अफशा कुरेशी हिने ८६ टक्के गुण संपादीत करून महाविद्यालयातून सर्व प्रथम येण्याचा बहुमान मिळवला.कु.शिफा कुरेशी ८५.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर चि.हुजेफ कुरेशी ८१ टक्के गुण मिळवून महा विद्यालयातून तृतीय आला.या परीक्षेसएकूण ४८ विद्यार्थी बसले होते. तेंव्हा महाविद्यालयाचा एकूण निकाल १०० टक्के लागला असुन विशेष प्राविण्यासह १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीत ३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर द्वितीय श्रेणीत २ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

महाविद्यालयातील ७५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळविलेले विद्यार्थी-सार्थक यादव - ८०.०० स्वाती जाधवर -७९.०० सुरज लोंढे - ७८.३३ स्नेहल मुळे - ७८.०० अस्मिता काशिद - ७७. ८३ वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे,उपाध्यक्ष नईमोद्दीन इनामदार, सचिव जी.बी.गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ,कोषाध्यक्ष फजिलोद्दिन काजी, विलास जोशी,नारायण अण्णा अंधारे,संदीप इंगळे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताईइंगळे, महाविद्यालयाचे प्राचार्य शंकर भैरट,मा.वि.च्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,प्रा.वि चे मु.अ.वसंत शितोळे, तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.

# प्रशासकीय अधिकारी पवनचक्की कंपन्यांना शेतकऱ्यांवर खंडणीचे गुन्हे दाखल करण्याचे सल्ले देऊ लागले कुंपनच शेत खाऊ लागले

## पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील शेतकऱ्यांचा गंभीर आरोप :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी @ पाटोदा



पवनचक्की कंपन्या शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत.शेतकरी प्रशासनाकडे तक्रारी करत आहेत.मात्र त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून कंपन्या पाळलेल्या गुंडासह सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतकऱ्यांच्या शेतातुन विनापरवाना व कोणताही मावेजा न देताच खंडणीचे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत आहेत.महसुल व पोलीस प्रशासन त्यांचे पगार पवनचक्की कंपन्या करत असल्यागत गुलाम होऊन पवनचक्की कंपन्यांना अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन नियमबाह्य मदत करत असल्याचे पहावयास मिळत आहे. त्यातच गंभीर बाब म्हणजे पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार हे पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांना शेतकऱ्यांनी कामास आडकाठी केली तर त्यांच्यावर खंडणीचे गुन्हे दाखल करा पुढचं आम्ही पाहुन घेऊ असं खुलेआम शेतकऱ्यांसमोर म्हणून पवनचक्की कंपन्यांच्या मुजोरीला बळ देत असल्याचा गंभीर आरोप अशोक कोटुळे,दासु बोराडे,चंदु बोराडे,

बापु बोराडे,लक्ष्मण कोटुळे , अनिकेत जाधव व ईतर शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना केला आहे.पाटोदा तालुक्यातील जवळाला शिवारातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे नुकसान करून पवनचक्की कंपन्यांच्या गाड्या जात असल्याची तक्रार आठवडाभरापुर्वी प्रशासनाकडे केली होती.मात्र त्या तक्रारीची दखल घेतली नाही.उलट कंपन्यांच्या गाड्यांना जाण्यासाठी रस्ता मोकळा करून देण्यासाठी महसूल व पोलीस प्रशासन घटनास्थळी पोहोचले.गाड्या सुरळीत मार्गी लावण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांनी नायब तहसीलदार दहिफळे यांना घटनास्थळी पाठवले.शेतक-यांची बाजु प्रशासनाने ऐकून घेतलीच नाही. पोलिस बंदोबस्त आणि पवनचक्की कंपन्यांचे कर्मचारी यांनी शेतकऱ्यांना अगदी घेराव घालून गाड्या मार्गस्थ केल्याचे शेतकरी कोटुळे यांनी सांगितले. याच वेळी प्रशासनाचा एक माणूस आणि ईतर कंपनीचे कर्मचारी एकत्र येऊन शेतकऱ्यांना न विचारताच खुणा करत होते. उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी जर कामात कोणी आडवे आले तर त्यांच्यावर खंडणीचे गुन्हे दाखल करा असा सल्ला दिल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समितीची स्थापना केलेली आहे. या समितींना पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे. तसेच पवन ऊर्जा प्रकल्पांची निर्मिती होत असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहार व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाकडे प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून योग्य ती कारवाई करणे. जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाचे अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतमालक, शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवून प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहकार्य करणे. इत्यादी अधिकार दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि पोलीस अधीक्षक बीड हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे उपविभागीय स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तहसीलदार सचिव आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासनाचे जाणीव दुर्लक्ष होत आहे. आता तर संनियंत्रण समितीचे अध्यक्ष आणि सचिवच शेतकऱ्यांचे ऐकुन न घेता पवनचक्की कंपन्यांना शेतकऱ्यांवर खंडणीचे गुन्हे दाखल करण्याचा सल्ला देत असल्याचा आरोप शेतकरी करत असतील तर कुंपतच शेत खात असुन शेतकऱ्यांनी कोणाकडे दाद मागायची?? असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली.

# तलवार बाळगल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता - ॲड. सचिन काळे

बीड राजयोग प्रतिनिधी

दिनांक ३०/०६/ २०२० रोजी दुपारी एक वाजता सुमारास पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की इसम नामे आकाश उर्फ तानाजी शिवाजी वरवट राहणार रामतीर्थ नाका पेठ बीड हा लोकांना धाक दाखवन्याच्या उद्देशाने रामतीर्थ नाक येथे तलवार बाळगून दहशत निर्माण करत आहे. त्याच्या कडे तलवार असून तो रामतीर्थ नाका परिसरात फिरत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावर सदर पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पंचांना घेऊन बातमीचा उदेश समजावून सांगुन रामतीर्थ नाका बीड येथे सुमारे दीड वाजता छापा मारला असता रामतीर्थ येथील चौकात तानाजी उर्फ आकाश वरवट हा रामतीर्थ नाक चौक येथे तलवार बाळगून दहशत निर्माण करत होता त्यास पकडून ताब्यात घेतले व दोन पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एका तलवार मिळून आली. या आरोपातून कोर्टाने त्यांना निर्दोष मुक्तता केली आहे.



घटनेची पुढील हकीगत अशी की, लालसर रंगाची लाकडी पुठ्ठ्याची तिची लांबी २८ इंच असून म्याना च्या समोरील बाजूस पितळी पत्रा आहे सदरील म्यान काढुन पाहताच तिचे पात्याची लांबी २७ इंच आहे अशी असलेली जुनी वापरतील तलवार मिळून आली त्या नुसार पोलिसांनी आरोपी तानाजी उर्फ आकाश वरवट याला पोलीस स्टेशन पेठ बीड येथे घेऊन जाऊन त्याचे विरोधात गु.र.नं १७३/२०२० नुसार गुन्हा दाखल केला. त्यास कलम ४/३५ शस्त्र अधिनियम दाखल केले व त्यानंतर पोलिसांन सदरील गुन्ह्यात तपास करून दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले. दोषारोपपत्रास आर.सी.सी.क्र २३६/२०२० असा दाखल झाला होता. फिर्यादी पक्षामार्फत ५ साक्षीदार तपासण्यात आले साक्षीदारांची साक्ष आरोपीविरुद्ध आरोप सिद्ध करूशकले नाही व आरोपीचे वकील ड. सचिन काळे यांनी घेतलेला बचाव व सबळ पुराव्या आधारे आरोपीस मा. प्रथमवर्ग न्यायदंधादिकारी साहेब बीड यांनी आरोपीची निर्दोष मुक्त केली. आरोपीच्या वतीने ड.सचिन काळे यांनी काम पहिले.

# शिरूर येथे आज तिरंगा रॅलीचे आयोजन

प्रतिनिधी @ मानुर

भारतीय जवानांनी पाकिस्तानी लष्करावर केलेल्या ऑपरेशन सिंदुरच्या अभूतपूर्व यशाबद्दल भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी शिरूर शहरात तिरंगा रॅलीचे आज आयोजन करण्यात आले आहे.ऑपरेशन सिंदुरच्या यशानंतर भारतीय सैन्यांच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन आज शुक्रवार रोजी सकाळी आठ वाजता करण्यात आले आहे.सदरील तिरंगा रॅली जिजामाता चौक ते गांधी चौक दरम्यान संपन्न होणार असून या रॅलीसाठी शिरूरसह,तालुक्यातील, पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# केज येथील वसंत विद्यालयाची ९८.८७ टक्के निकालासह उज्वल यशाची परंपरा कायम

प्रतिनिधी @ केज

केज येथील श्रीछत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलीत वसंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी.बोर्ड परिक्षेत घवघवीत यश संपादन केले असुन या शाळेचा विद्यार्थी कृष्णा बालासाहेब घुगे याने ९७.०० टक्के गुण घेवुन प्रथम आला आहे तर प्रणव नामदेव नाईक व युवराज सोपान भोकरे अनुक्रमे ९२.८० व ९२.६० टक्के घेवुन द्वितीय व तृतीय आले आहेत.राजेश खेत्रे ९२.२०,महेश शिंदे ९२.००,अभिषेक घुले ९१.२०,अमर भोसले ९०.८०,समाधान पिसुरे ९०.४०,प्रसाद काकडे ९०.४०गुण घेवुन विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.या सर्व यशस्वी विद्यार्थी व विद्यार्थिनींचे अभिनंदन संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर,प्राचार्य प्रकाश धेंडे,उपप्राचार्य हेमंत देशमुख,पर्यवेक्षक अशोक कोठावळे यांनी केले आहे.

# चंदनसावरगाव येथे इयत्ता दहावी,बारावी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

प्रतिनिधी @ केज



दिनांक १५ मे २०२५ गुरुवार रोजी मौजे चंदन सावरगाव येथे सकल मराठा सेवक मनोज दादा जरांगे पाटील यांचे कट्टर समर्थक डिंगाबर श्रीहरी तपसे यांच्या वतीने इयत्ता दहावी तसेच बारावी परीक्षे मध्ये प्रथम,द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवले ल्या विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी चंदन सावरगाव चे सरपंच जालिंदर दळवी तर प्रमुख अतिथी म्हणून छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी दादा ठोंबरे, पैठण केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ.रामकिशन मुळे, उमरी शाळेचे मुख्याध्यापक राजेभाऊ इंगळे,चंदन सावरगावचे उपसरपंच बालासाहेब तपसे,उद्योजक राजेभाऊ तपसे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष शंकर तपसे,लालबहादूर शास्त्री विद्यालय चंदन सावरगाव येथील श्री. खुळे सर व सपाटे सर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.खुळे सरांनी केले तर इयत्ता अकरावीची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने कशाप्रकारे पार पडणार आहे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन पैठण केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ. रामकिशन मुळे यांनी केले.याप्रसंगी दहावी व बारावी परीक्षेतील खालील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.श्रद्धा सुधीर तपसे, अश्विनी दत्तात्रेय तपसे, सृष्टी उत्तरेश्वर तपसे, साक्षी परमेश्वर धुमक, सुप्रिया दिलीप घुले, भक्ती महादेव काळे, योगेश्वरी राजेभाऊ तपसे,अश्विनी दत्तात्रय तपसे व एमपीएससी परीक्षेत गटविकास अधिकारी श्रेणी एक या पदावर नुकतीच निवड झालेले नारायण राजेभाऊ इंगळे यांचाही शाल,पुष्पहार व मनोज दादा जरांगेपाटील यांची प्रतिमा व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.या प्रसंगी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रकाश काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपसरपंच बालासाहेब तपसे यांनी केले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# पोलीस निरीक्षक पदाचा पदभार स्वीकारतात कारवाईचा धडाका

पालम (प्रतिनिधी): पालम पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक सतीश राजांना दोन्कलवार यांनी पदभार स्वीकारताच अवघ्या दहा दिवसात कारवाईचा मोठा धडाका लावल्याने अवैद्य धंदेवाल्यांची चांगलेच धाबे दणाणले आहेत.पालम पोलीस स्टेशन अंतर्गत ८२ गावे येतात. पालम शहरसह इतर गावांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ३ मे रोजी पोलीस निरीक्षक पदाचा प्रभारी पदभार सतीश राजना दोन्कलवार यांनी हाती घेतला आहे. गेल्या १४ दिवसात अवैद्य दारू मुद्देमालासह कारवाईचा बडगा उगारला आहे. एकाच दिवशी पाच ठिकाणी अवैद्य दारूवर सापळा रचून धाड टाकत १५ ते २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच मटका चालवणाऱ्यावर सापळा रचुन कार्यवाहीत दहा ते पंधरा हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. दि. १४ रोजी ४ वाजता एम एच. ०४ एच वाय ५०३० या क्रमांकांच्या टाटा कंपनीचा हायवा चोरट्या वाळूची वाहतूक करीत असतांना पकडुन पंधरा लाख, पंधरा हजाराची कार्यवाही केली. या धडक कारवाई मुळे अवैध धंदेवाल्याचे दाबे दणाणले आहेत. अवघ्या१४ दिवसांमध्ये पोलीस कर्मचारी, पोलीस अधिकारी यांना विश्वासात घेत आपल्या कर्तव्याची चुणूक दाखवत अवैध धंद्यावर वचक निर्माण केल्यामुळे नागरिकातून प्रभारी पोलीस निरीक्षक सतीश दोन्कलवाड यांच्यावर समाधान व्यक्त करत कौतुक करण्यात येत आहे.



## आत्महत्याग्रस्त कुटुंबास शेक हॅन्ड कडुन शेळी व पिलाची भेट



परभणी (प्रतिनिधी)
शेक हॅन्डल वतीने प्रत्येक सणानिमित्त निराधार विधवा महिलांना उदरनिर्वाहाचे साधन दिल्या जाते. छत्रपती संभाजी राजे यांची जयंती यांच्या जयंतीचे औचित्य साधून सीमा बालाजी बालाजी भुमरे या ताईस शेळी व एक पाट मदतीचा हात शेक हॅन्ड कडून देण्यात आला.

औढा तालुक्यातील वडस येथील सीमा भुमरे यांच्या पतिने परिस्थितिला व कर्जाला कंटाळून आत्महत्या केली. त्यांना दोन मुले असून मुलगा सखाराम वर्ग तिसरीत शिकत असून मुलगी शिवानी अंगणवाडीत शिकते. जुन मध्ये होणाऱ्या शैक्षणिक वाटपात त्यांच्या शैक्षणिक साहित्याचे पालकत्व शेक हॅन्ड कडून घेण्यात आले. सीमा भुमरे यांना शेती अथवा इतर संपत्ती नसल्यामुळे त्या मजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात.त्यांच्या एकंदरीत परिस्थितीचा विचार करून त्यांच्या मुलांच्या शिक्षणास हातभार लागावा या उद्देशाने त्यांना शेळी व पिलाची मदत देण्यात आली. त्याचप्रमाणे प्रा.उत्तमराव इंगळे यांच्याकडून त्यांना व त्यांच्या मुलांना कपडे भेट देण्यात आले. शेळी व पिलासाठी शेक हॅन्ड च्या अनेक सदस्यांनी मदतीचा हात पुढे केला त्यात अमृत देशमुख, सरिता स्वामी, जिवन शेवाळे, -व.वैभव जाधव, छाया गायकवाड यांच्यासह १८ जणांनी आर्थिक पाठबळ दिले. या कार्यक्रमासाठी गावातील शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नवनाथ नेव्हल, पांडुरंग भुमरे, गावातील गावकरी मंडळी यांच्यासह शेक हॅन्डचे रोहिदास कदम, पांडुरंग चव्हाण, चंद्रकांत भोसले, शिक्षक मुंजा चव्हाण, नितीन तांदळे, परमेश्वर सिराळ, शरद लोहट आदी उपस्थित होते.

## प्रहार जनशक्ती पक्षाचे पालकमंत्र्यांच्या घरासमोर रक्तदान आंदोलन

परभणी (प्रतिनिधी)
महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकी अगोदर संपूर्ण कर्जमाफी देण्याचे जे आश्वासन दिले होते ते आश्वासन पूर्ण करावे व राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करून त्यांचा सातबारा कोरा करावा, शेतीमालाची खरेदी ही हमीभावानेच व्हावी आणि जे व्यापारी हमीभावाने शेतीमाल खरेदी करणार नाहीत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी तसेच दिव्यांगांना सहा हजार रुपये मानधन मिळावे या मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वामध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंती चे औचित्य साधून आज रोजी महाराष्ट्रातील सर्व मंत्री व राज्यमंत्र्यांच्या घरासमोर रक्तदान आंदोलन घेण्यात येत आहे.




प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात सुरू असलेल्या रक्तदान आंदोलना प्रमाणेच आज रोजी छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रहार जनशक्ती पक्षच्या वतीने परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री मेघनादीदी बोर्डीकर यांच्या घरासमोर रक्तदान आंदोलन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात २६ जणांनी स्वेच्छा रक्तदान केले. यावेळी पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा प्रमुख शिवलिंग बोधने, उपजिल्हाप्रमुख रामेश्वर जाधव, परभणी तालुकाप्रमुख उद्धव गरुड, पाथरी तालुका प्रमुख दीपक खुडे, सोनपेठ तालुकाप्रमुख अशोक मस्के, पूर्णा शहर प्रमुख संजय वाघमारे, परभणी शहर प्रमुख अंकुश गिरी, शहरचिटणीस वैभव संघई, केशव जाधव, सिद्धेश्वर आगलावे, पवन जोगदंड यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पालम गटशिक्षणाधिकारीपदी सुभाषराव आमले रूजू

पालम (प्रतिनिधी)
पालम पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी तथा जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजीराव गायकवाड ३० एप्रील ला सेवानिवृत्त झाल्याने गटशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुभाषराव आमले यांनी आज दि १५ रोजी स्विकारला आहे.



सुभाषराव आमले हे दि१५ रोजी गटसाधन केंद्र पालम येथे हजर झाले तेव्हा गटसाधन केंद्रातील सर्व साधन व्यक्ती, विषय शिक्षक व शिक्षक वृंद यांच्या वतीने त्याचा शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख सुभाष चव्हाण, उडतेवार, मुख्याध्यापक साहेबराव राठोड, विषय तज्ञ शिक्षक, साधन व्यक्ती तत्तापुरे, सचिन बरूरे, मद्देवाड, गित्ते, हराळ व इतर गटसाधन केंद्रातील सर्व स्टाफ व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक वृंद उपस्थित होते. सुभाषराव आमले हे एक कार्यतत्पर, कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी म्हणून पालम पंचायत समितीस लाभल्याने तालूक्यातील शिक्षक बदल्या, अकरावी नुतन प्रवेश, शाळा नुतन प्रवेश, विविध शैक्षणिक सरकारी योजना विद्यार्थी, शिक्षक, पालक व शाळा, आणि शैक्षणिक अडीअडचणी सोडविण्यासाठी आमले हे नक्किच सकारात्मक, सहकार्याची भुमिका घेवून सर्व प्रश्न सोडविण्या साठी आदर्श काम करतील अशा भावना शिक्षण विभाग पालम व शिक्षक बांधव यांच्यातून व्यक्त होत आहे.

## महिला लोकशाही दिनाचे आयोजन

परभणी (प्रतिनिधी)
समस्याग्रस्त व पीडित महिलांनी सोमवार, दि. १९ मे, २०२५ रोजी महिला लोकशाही दिनी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन घेण्यात येतो.

सोमवार, दि. १९ मे, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिन होणार आहे. संबंधीत समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमूद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित राहावे. समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांना न्याय मिळावा तसेच समाजातील त्यांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. तरी जिल्ह्यातील महिलांनी त्यांच्या वैयक्तिक स्वरूपाच्या तक्रारी विहीत नमुन्यात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, परभणी यांच्या कार्यालयात दाखल करण्यात याव्यात, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

# कृषी सहाय्यक संघटनेचे परभणीत काम बंद आंदोलन



परभणी (प्रतिनिधी): कृषी सहाय्यकांची पदनाम बद्दल करून त्यांना शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी लॅपटॉपचे वितरण करावे या व इतर मागण्यांसाठी कृषी सहाय्यक संघटनेच्या वतीने गुरुवार दिनांक १५ मे पासून कामबंधून आंदोलन पुकारले आहे.सध्या खरीप हंगाम तोंडावर आला असून ग्राम स्तरावर सर्वात मोठे मनुष्यबळ हे कृषी सहाय्यकांची आहे गेल्या दोन महिन्यापूर्वी शासनाकडे विविध मागण्यांचा पाठपुरावा करण्यात आला आहे

मात्र शासनाने यासंदर्भात कुठलीही चर्चा केली नसल्याने काम बंद आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे कृषी सहाय्यक यांच्या बदनाम बदल व शेतकऱ्यांच्या सोयीसाठी सर्व कृषी सहायकांना लॅपटॉपचे वितरण करण्यात यावे या व इतर मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. आंदोलन काळात शेतकऱ्यांची गैरसोय होय होऊ नये म्हणून तालुकास्तरावर जमा होणारे कृषी सहाय्यक आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या कामावर लक्ष ठेवतील गैरसोय होत असल्याचे लक्षात येताच सहाय्यक मदत करतील. सर्व कृषी खाते डिजिटल होत आहे परंतु कृषी सहाय्यकांना लॅपटॉप दिला जात नाही त्याचा परिणाम सेवावर होत असल्याचे म्हटले आहे.

## भारतीय सैन्य दलाच्या सन्मानार्थ उद्या परभणीत तिरंगा रॅली

परभणी (प्रतिनिधी) : भारतीय संरक्षण दलाच्या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ शुक्रवार १६ मे रोजी 'तुम्ही आम्ही परभणीकर' यांच्या वतीने शहरातून तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत आपल्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे नष्ट करून टाकले. पाकिस्तानच्या संरक्षणदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणांचेही या हल्ल्यात मोठे नुकसान झाले आहे. भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कणखर नेतृत्वाच्या सन्मानार्थ देशभरात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने परभणी शहरातही शुक्रवारी तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. येथील शनिवार बाजारातून सायंकाळी ५ वाजता या तिरंगा रॅलीस प्रारंभ होणार आहे. येथून ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक - गांधी पार्क - अष्टभुजा देवी मार्गे - नारायण चाळ - स्टेशन रोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात दाखल होणार आहे. या ठिकाणी या यात्रेचा समारोप होणार आहे.

यात्रेत जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री सौ. मेघना साकोरे - बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी आयोजित कार्यक्रमात आजी-माजी व स्वातंत्र्य सैनिक यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या तिरंगा रॅलीत सर्व देशप्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन 'तुम्ही आम्ही परभणीकर' यांच्या वतीने करण्यात आले आहे.



हजरत सय्यद शहाबुद्दीन दर्गा येथे उर्साच्या निमित्ताने चादर चढवण्याचा कार्यक्रमात सहभागी होता आले याप्रसंगी काँग्रेसचे जिल्हा सरचिटनीस श्री मिलिंद सावंत,पोलीस निरीक्षक श्री दीपक बोरसे, दर्गा मुजावर नानूभाई,माजी नगरसेवक रहिमभाई, माजी नगरसेवक तथा शिवसेना शहर प्रमुख श्री विठ्ठल काळबांडे, श्री पंजाब पोळ उपस्थित होतो.या कार्यक्रमाचे आयोजन असद लष्करिया,आसिफ लष्करिया, सिद्धिक लष्करिया यांनी केले होते.




## परभणी महापालिकेतील तीन अधिकाऱ्यांना पदोन्नती

परभणी (प्रतिनिधी): शहर महानगरपालिका अंतर्गत तीन अधिकारी यांना सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीच्या आदेशांचे वितरण करण्यात आले. महापालिकतील मार्केट कर निरीक्षक रमेश तुकाराम कोल्हे यांची सहाय्यक कर निरीक्षक श्रेणी-३ प्रशासकीय सेवा, सहायक लेखापाल भगवान यादव यांची लेखाधिकारी श्रेणी-२ लेखा सेवा आणि मुख्य स्वच्छता निरीक्षक करन गायकवाड यांची मुख्य स्वच्छता अधिकारी श्रेणी-१ सार्वजनीक आरोग्य सेवा या पदावर पदोन्नती करण्यात आलेली आहे. पदोन्नत झालेल्या कर्मचा-यांना आयुक्त धैर्यशील जाधव यांनी पुढील सेवा कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या. सदर आदेशाचे वितरण उपायुक्त बबन तडवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आस्थापना विभाग प्रमुख शिवाजी सरनाईक, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष नासेर खान, सहायक लेखा परिक्षक मंजूर अहसन, प्रिया जोशी व किरण गायकवाड आदी कर्मचारी उपस्थित होते.

# पीएम श्री जि.प.मा.शा. टाकळसिंग शाळेची उज्वल यशाची परंपरा कायम

## आदर्श मुख्याध्यापक महेश शिंदे यांचे उत्कृष्ट नियोजन

प्रतिनिधी @ आष्टी




पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंग ता. आष्टी, जि. बीड या शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम राखत याही वर्षी शाळेचा निकाल कायम ठेवला आहे. यासाठी शाळेचे आदर्श मुख्याध्यापक महेश शिंदे सरांनी वर्षभर उत्कृष्ट नियोजन केल्यामुळे व शाळेतील सर्व शिक्षकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली जादा तास, नियमित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यामुळे शाळेच्या निकालाची परंपरा कायम राखली आहे.प्रथम क्रमांक - चि. मोकाशे आशिष गहिनीनाथ ९४ %, द्वितीय क्रमांक - कु. जगताप प्रगती श्रीराम ९३.४० %, तृतीय क्रमांक - चि. कुमकर आदित्य संजय ९३.२० % गुण घेतले आहेत. या दहावी बोर्ड परीक्षेमध्ये प्रशालेचे एकूण ८० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी एक विद्यार्थीनी गैरहजर राहिल्यामुळे तिचा निकाल आला नाही. पैकी ७९ विद्यार्थी चांगले गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. ९० % पेक्षा जास्त गुण घेणारे २१ विद्यार्थी आहेत.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, पालकांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षक बंधू - भगिनीं यांचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य तसेच गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ, शिक्षक प्रेमी नागरिक यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आलेल्या आहेत.

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्नेहल देशमुखने मिळवले दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

बीड राजयोग प्रतिनिधी

स्वातंत्र्यवीर सावरकर माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी स्नेहल सुधाकर देशमुख या विद्यार्थिनीने प्रतिकूल मात करत ९३.८०% गुण मिळवत दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले. तिच्या या सुयशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची. कोणतेही क्लासेस लावण्याची आर्थिक परिस्थिती नसल्याने शाळेच्या अभ्यासक्रमावर आणि स्वअध्ययनाने तिने प्रामाणिकपणे अभ्यास केला. मुलीच्या शिक्षणाची ओढ लक्षात घेता आई वडील आर्थिक परिस्थिती पुढे हतबल झाले.मात्र हिंमत न हरता त्यांनी वह्या पुस्तके घेण्यासाठी पैसे नसल्याने अनेकांची मदत घेऊन जुन्या वह्या पुस्तके घेऊन तिला अभ्यासासाठी दिली. प्रसंगी तिने सुद्धा काम करून शिक्षण घेतले. पण हार मानली नाही. तिने घरात लाईट नसताना, क्लासेस नसताना, वह्या पुस्तके नसताना, योग्य मार्गदर्शक नसतांना इतकेच नाही सकाळी जेवण झाले तर संध्याकाळी होईल की नाही अशी परिस्थिती असताना सुद्धा रात्रंदिवस अभ्यास करून दहावीच्या परीक्षेत तब्बल ९३.८०% घेऊन घवघवीत यश मिळवले आहे. तिने मिळवलेले सुयश प्रतिकूल परिस्थितीशी झगडत असलेल्या आणि सर्व सुख सुविधा असतानाही अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्नेहल आज त्यांच्यासाठी आयडॉल ठरली आहे. तिने मिळवलेल्या या सुयशाबद्दल सावरकर विद्यालयाचे मुख्याध्यापक विठ्ठल काळे सर, तिच्या वर्गशिक्षिका माधवी डोळे मॅडम यांनी विशेष अभिनंदन केले आहे.तिच्या या सुयशा मध्ये आई अर्चना आणि वडील सुधाकर देशमुख यांचे देखील मोठे योगदान आहे. स्नेहलने मिळवलेल्या सुयशाबद्दल दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने देखील पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# बाळनाथ विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम..

बीड प्रतिनिधी - बीड तालुक्यातील बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेचा या वर्षीचा १० वी चा निकाल हा शंभर टक्के लागला आहे. श्री उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बाळनाथ विद्यालय चाकरवाडी तालुका जिल्हा बीड १० वी फेब्रुवारी/मार्च २०२५ चा निकाल शंभर टक्के लागला आहे ४१ पैकी ४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे २४ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत २ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान विद्यार्थीनीने मिळवला आहे. कु. जगताप दीक्षा भाऊसाहेब ९४.२०% घेऊन प्रथम क्रमांक मिळवला हे. तसेच द्वितीय क्रमांक डोईफोडे मानसी चंद्रकांत ९३.६०% या विद्यार्थिनीने मिळवला आहे. तृतीय क्रमांक जगताप स्वरूपा अतुल ९३.२०% यांनी मिळवला आहे. तसेच विद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी, तृतीय श्रेणी मध्ये आपला क्रमांक मिळवला असून विद्यालयाचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे तसेच कवडे काजल केशव ९२.८०, जांभळे वैभव सुरेश ९१.८०, अनवणे राजनंदिनी राजेंद्र ९०.८०,

# शहरातील अर्धवट राहिलेले कामे नगर परिषदेने त्वरित पूर्ण करावेत : वैजनाथ कळसकर

प्रतिनिधी @ परळी

शहरातील विविध कामे नगर पालिकेने सुरू करून अनेक वर्ष झाली असून ते अद्यापही अर्धवट स्थितीत आहेत. याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे ते सर्व कामे त्वरीत पूर्ण करण्याची मागणी केली आहे अशी माहिती मनसेचे शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर यांनी दिली आहे.



या निवेदनात राष्ट्रमाता जिजामाता उद्यान, डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालय, बौद्धविहार, अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, मलनिःसारहण शुद्धिकरण प्रकल्प , पाणीपुरवठा पाइपलाइन योजना, भूमिगत गटार योजना, विविध भागातील रस्ते व दोन रस्त्या दरम्यानचे पॅचेस, पेव्हर ब्लॉक, शादीखाने, लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर, घन कचरा व्यवस्थापन, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छता गृह, नाली बांधकाम आदी कामे गेल्या कित्येक वर्षापासून अर्धवट अवस्थेत आहेत. यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. जर ही कामे तत्काळ पूर्ण केले नाहीत तर मनसे नगर परिषदे समोर अर्धनग्न आंदोलन करणार असल्याची माहिती मनसेने दिली आहे.

मनसे शिष्टमंडळाने आज नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांची भेट घेऊन निवेदन देऊन चर्चा केली. यावेळी मनसे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता दहिवाळ, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाथरकर, शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर, तालुका उपाध्यक्ष विठ्ठलदादा झीलमेवाड, शहर उपाध्यक्ष प्रशांत कामाळे, मनविसेचे जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत सातपुते, आत्माराम खंदारकर, अंकुश उजनकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# धारूर पंचायत समितीतील तिसरा डोळा बंद ;बीडीओचे कार्यालयावर नियंत्रणच नाही ?

प्रतिनिधी @ धारूर


धारूर पंचायत समितीमधील तिसरा डोळा (सीसीटीव्ही)बंद अवस्थेत असुन, यासोबतच बायोमेट्रिक मशिनही बंदच असल्याचे दिसुन येते.यामुळे कर्मचारी कार्यालयात सतत गैरहजर राहतात.यावरून कार्यलयावर बीडीओ यांचे कसलेच नियंत्रण नसल्याचे स्पष्ट दिसते.तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेऊन, पं. स.कार्यलयातील सिसीटिव्ही कॅमेरे व बायोमेट्रिक तात्काळ चालु करून गैरहजर कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी.अशी मागणी तालुक्यातील नागरिक करत आहेत. यासंदर्भात माहिती अशी की,धारूर पंचायत समिती कार्यालयात बसवण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे गेल्या अनेक महिन्यांपासून बंद अवस्थेत आहेत. तसेच कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीसाठी असलेले बायोमेट्रिक मशिनही गेल्या महिन्यांपासून बंद आहे.हे दोन्ही महत्त्वाचे यंत्र कायम बंद अवस्थेत असल्याने याचा फायदा या कार्यालयातील कर्मचारी घेत असल्याचे दिसत आहे.कारण पं.स.तील बहुतांश कर्मचारी दुपार नंतर दांडीवर यात्रेवरच असतात. अनेक खुर्च्या रिकाम्याच दिसून येतात. जर बायोमेट्रिक अथवा सीसीटीव्ही चालु असते तर त्यांची नजर गैरहजर कर्मचाऱ्यांवर राहीली असती.ती बंद असल्यानेच कर्मचारी त्याचा फायदा घेत गैरहजर राहतात. पं.स.म्हणजे तालुक्यातील नागरिकांचे अनेक महत्त्वाचे कामे या कार्यालयास असतात. त्यामुळे तालुक्यातील नागरिक आपल्या कामानिमित्त पं.स.कार्यालयात येतात. परंतु कर्मचारीच हजर नसल्याने नागरिकांना काम पुर्ण न करताच रिकाम्या हाती परतावे लागते.यासर्व परिस्थितीकडे या कार्यालयाचे जबाबदार अधिकारी असलेले गटविकास अधिकारी यांचे नियंत्रण नसुन, साफ दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे.यासर्वामुळे तालुक्यातील नागरिक हकनाक भरडला जात असुन, त्यांच्या कामांचा खोळंबा होत आहे.तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी धारूर पंचायत समिती कार्यालयातील बंद सीसीटीव्ही व बायोमेट्रिक मशिन तात्काळ चालु करून गैरहजर कर्मचाऱ्यांवर कडक व दंडात्मक कारवाई करावी.



# शिरूर कासार येथील कालिकादेवी विद्यालयाचे, दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

प्रतिनिधी @ मानुर

आदर्श शिक्षण संस्था बीड, संचलित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी मार्च २०२५ च्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून यंदाही उज्वल निकालाची परंपरा कायम राखली असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी च्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून एस.एस. सी. बोर्ड परीक्षेत विद्यालयाचा एकूण निकाल ९९.३७ टक्के लागला आहे.




विद्यालयातून परीक्षेला १६० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते पैकी १५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विशेष प्राविण्यामध्ये १२५ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये २९ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीमध्ये ०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून सर्वप्रथम भोकरे आदित्य गजानन ९४.६० / सर्वद्वितीयः कु.भारती प्रथमेश पांडुरंग ९३.६० कु. शेख अल्फिया अस्लम ९३.६० /, कु. विघ्ने ज्ञानेश्वरी शिवाजी ९३.६०/तर सर्वतृतीय कु. मोरे दीक्षा अशोक ९३.४०/, कु. विघ्ने कीर्ती नारायण ९३.४० / टक्के घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे, आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव, माजी मंत्री मा. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब, युवा नेते रोहित क्षीरसागर संस्थेचे प्रशासक डॉ. राजु मचाले साहेब, सहाय्यक प्रशासन अधिकारी श्री योगेश पवार सर, कार्यवाहक श्री एम. ए. राऊत सर, विद्यालयाचे प्राचार्य, अप्पासाहेब येवले साहेब, उपमुख्याध्यापक श्री राठोड सर, उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने सर, पर्यवेक्षक जनार्दन काळे सर, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. काकडे सर तसेच अध्यापनाचे अतिशय महत्त्वाचे कार्य पार पाडणारे सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# संत रामकृष्ण महाराज विद्या मंदिर हादगाव शाळेचा इयत्ता दहावी चा निकाल १०० टक्के

## चिंचोली माळी केंद्रातून सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यातील हादगाव येथील संत रामकृष्ण महाराज विद्यामंदिर शाळेचा मार्च २०२५ मध्ये झालेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल दिनांक १३ मे २०२५ रोजी दुपारी एक वाजता जाहीर झाला. शाळेने गेल्या पाच वर्षा पासूनची उज्वलयशाची परंपरा कायम राखली असून शाळेचा निकाल १०० % टक्के लागलेला आहे.या शाळेतील शिक्षक वृंदांनी विद्यार्थी घडवून सातत्याने संस्थेचे,गावाचे, तालुक्याचे,नाव उंचावण्याचे कामकेलेले आहे.चालू वर्षी ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी अटकेपार झेंडा रोवला आहे.प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शाळेचा निकाल उत्कृष्ट लागला असून विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अतिशय चांगले गुण प्राप्त केले आहेत.शाळेमध्ये सर्व प्रथम येण्याचा मान कु. वनवे प्रणिता शशिकांत ९६.००%,सारूकवाडी,द्वितीय कु.गदळे आर्या अण्णासाहेब ९४.००% हादगाव तर तृतीय स्थानी भांगे ओंकार पंडित ९३.८०% डोका याने पटकावले आहे. शाळेमध्ये इयत्ता दहावी च्या वर्गातील ३१ पैकी ३१ विध्यार्थी पास झाले आहेत.इतक्या मोठ्या प्रमाणात यश मिळवले असल्याने शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव विद्यार्थ्यांवर होत आहे.दि.१४ मे २०२५ रोजी वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन शाळेच्या व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार समारंभ पार पडला.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माजी उपसरपंच श्री. महादेव वायबसे यांनी हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे,शिक्षकांच्या विद्यार्थ्याप्रती असलेल्या समर्पणाचे वपालकांच्या त्यागाचे असल्याचे मत मांडले.तसेचविद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.यावेळी सरपंच उमेश यादव, अनंत वनवे,जालिंदर भांगे,लालासाहेब वायबसे,मुख्याध्यापक, शिक्षक वृंद,ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येनेउपस्थित होते.




आज पर्यंत संत रामकृष्ण महाराज विद्यामंदिर हादगाव या शाळेत शिक्षणघेतलेल्या विद्यार्थ्यापैकी बरेच विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर पोलीस, सैनिक अशा पदावर नोकरी करत आहेत. याच शाळेचा विद्यार्थी नंदकिशोर संदिपानभांगे डोका या विद्यार्थ्यांची यावर्षी एमपीएससी मार्फत राजपत्रित अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

# 'ऑपरेशन सिंदूर' च्या यशानंतर भारतीय सेनेच्या सन्मानार्थ गेवराई येथे तिरंगा यात्रा

गेवराई (प्रतिनिधी)

'ऑपरेशन सिंदूर' च्या यशानंतर भारतीय सेनेच्या सन्मानार्थ गेवराई येथे तिरंगा यात्रा भारतीय जनता पार्टीच्या तिन्ही मंडळाच्या वतीने शहरांमध्ये मोटरसायकल तिरंगा रॅलीचे आयोजन केले होते. मोटरसायकल रॅली भारतीय जनता पार्टीचे तालुका कार्यालय जुना बस स्टँड पासून निघाली शास्त्री चौकात आल्यानंतर गेवराई विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप यांच्या हस्ते लालबहादूर शास्त्री यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कार्यकर्त्यांनी भारतीय सेनेच्या सन्मानार्थ घोषणाबाजी केली तसेच भारत मातेचा जयघोष करून शहरामध्ये सर्व मुख्य रस्त्यांमधून मोटरसायकल रॅली फिरवली त्यानंतर भारतीय जनता पार्टी कार्यालयात आल्यानंतर भारत मातेच्या प्रतिमेला हार घालून राष्ट्रगीताने तिरंगा यात्रेची सांगता करण्यात आली, तिरंगा मोटरसायकल रॅली यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचा तालुका अध्यक्ष अँड उध्दव रासकर व राजेश पवार , संतोष थोरात व विकास पवार यांनी परिश्रम घेतले या रॅलीमध्ये भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष प्रकाश काका सुरवसे ,पि.टि चव्हाण, डॉ. औटी, अशोक शिंदे , देविदास खरात, बळीभाऊ करे डॉ . इब्राहिम शेख,अँड अक्षय दानवे, परमेश्वर राठोड, अण्णा राऊत,साईनाथ सुरवसे, रामचंद्र कोळेकर,पप्पू खेडकर, प्रदीप उगलमुगले,मच्छिंद्र यादव ,सुशील भोपळे ,ज्ञानेश्वर खाडे, विलास शिंदे, यशवंत नागरे,नारायण गलधर, संदीप गलधर, नारायण गोल्हार, निलेश सानप, शाम पाटील, विनोद राठोड,विकास गायकवाड, गोविंद रासकर, राजु गाढे यांच्यासह शेकडो कार्यकर्त व मोठ्या प्रमाणात नागरिक रॅलीमध्ये सहभागी झाले होते




# खुर्शीद आलम यांचे ऑल इंडिया ओबीसी संघटनेच्या वतीने सत्कार

## हिंदू मुस्लिम ओबीसी एस.सी. एस.टी. वि.जी.एन.टी. शहराध्यक्षपदी निवड

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यामध्ये हिंदू आणि मुस्लिम समाजाच्या विविध अनेक पोट जाती जमाती असुन यामध्ये हिंदू मुस्लिम दोन्ही समाजांमध्ये ओ.बी.सी.सह भटके विमुक्त जाती जमाती आहेत ज्यांना सरकारने आर्थिक व सामाजिक दृष्ट्या प्रबळ करण्यासाठी शैक्षणिक, उद्द्योग, नौकरी, राजकीय क्षेत्रासह इतर अनेक क्षेत्रांत सहुलती दिलेल्या आहेत पण लोकांत जागृती नसल्यामुळे त्यांना त्यांच्या हक्काचे सहुलती मिळत नाही म्हणून या गोरगरीब समाजामध्ये मिळुन मिसळून त्यांची कामे करून त्यांच्यामध्ये जनजागृती करणारे कसे सर्व परिचित बीड नगरपरिषदेचे माजी सभापती खुर्शीद आलम यांची निवड हिंदू मुस्लिम ओबीसी विमुक्त भटके जाती जमाती संघटनेचे अध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव साहेब यांनी सर्वानुमते बिनविरोध निवड केली आहे, या निमित्ताने ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशन या सामाजिक संघटनेच्या वतीने खुर्शीद आलम यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ओबीसी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख जाकेर साहेब,शहराध्यक्ष खालेद साहेब,शेख फिरोज भाई,मोमीन शाफे,सैय्यद नबिलउजमा,हकीम मन्यार,सलाम सेठ,वजीर आत्तार,एजाज इनामदार, नायाजी सर,शेख मोहसीन,अब्बास इनामदार, रफिक कुरेशी यांच्यासह सर्व मुस्लिम बांधव उपस्थित होते,

